किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## आपल्या आजूबाजूस घडणा-या विविध घटनांचा 'अर्थ'बोध करून देणारे मासिक

21/10/08

३ ●सुपंथ
५ ●सारे काही पर्यावरणासाठी
११ ●सहकार्यातून नेतृत्व
१७ ● कथा पुसटल्या सीमारेषांची
२३ ●भारतातील राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्ष
३१ ● जिकडेतिकडे (पौष्टिक पदार्थांसाठी...)

खंड ७ : अंक ८ नोव्हेंबर २००८

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

<u>वार्षिक वर्गणी १००/- रुपये</u>

**(परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**<u>'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.</u>**

**<u>वर्गणीसाठी पत्ता</u> :**



**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**

**खंड ७ (अंक ८) नोव्हेंबर २००८**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणा-या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

## अर्थबोधपत्रिकेचा हेतू

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- **मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन**
- **निवडक साहित्याचे संकलन**
- **संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड**
- **संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.**

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

# सुपंथ

आजचा मानवसमूह प्रगत आहे, असे आपण नेहमी म्हणतो. या वाक्यात समूहाची म्हणजे विविध समाजगटांची, विविध समाजांची प्रगती अपेक्षित आहे. प्रगती होणे याचा अर्थ पुढे जाणे, उत्कर्ष होणे. कोणत्याही समाजाचा उत्कर्ष होण्यासाठी त्याने सुपंथाची कास धरणे हेही येथे गृहीत आहे. समाजाची वाटचाल सुपंथावरून होण्यामध्ये समाजाची मूल्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. ही मूल्ये माणसाला संस्कृतीद्वारे प्राप्त होत असतात. संस्कृती ही प्रवाही असते. काळाच्या ओघात तिच्यात बदल होत जातात. काही संस्कृती या बदलांना सामो-या जातात. त्यामुळे बदलत्या काळाचे प्रतिबिंब त्यांच्यात डोकावते. साहजिकच काही मूल्ये टिकून राहतात तर काही बदलतात. बदललेल्या काळाशी विसंगत ठरल्याने अप्रस्तुत बनलेली काही मूल्ये या प्रक्रियेदरम्यान जशी गळून पडतात त्याचप्रमाणे काही नवीन मूल्ये स्वीकारलीही जातात. मूल्यांच्या आधारे सुपंथाकडे जाताना म्हणजे समाज प्रगतिपथावर असताना काही अनुचित घडू नये यासाठी हा मूल्यांचा पाया पुनःपुन्हा तपासून पाहावा लागतो. आवश्यकता असल्यास काही मूलगामी बदल समाजाला स्वीकारावे लागतात. पृथ्वीचे वाढते तापमान (ग्लोबल वॉर्मिंग) आणि जागतिकीकरण (ग्लोबलायझेशन) यांमुळे असे काही मूलगामी बदल देशोदेशींच्या समाजांत होत आहेत. त्यातही, पृथ्वीचे वाढते तापमान हा तर सर्वांसाठी अतिशय काळजीचा मुद्दा बनला आहे. कारण त्यामुळे मानवसमूहांचे अस्तित्वच धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या धोक्याची जाणीव झाल्याने अनेकानेक विषयांतील तज्ज्ञांचे लक्ष या मुद्याकडे जाऊ लागले आहे. अलीकडे, पर्यावरणतज्ज्ञांबरोबर अर्थतज्ज्ञही 'ग्लोबल वॉर्मिंग'बाबत सचिंत आहेत. परंतु, केवळ चिंता व्यक्त करून ते थांबत नाहीत, तर या संबंधात काय कृती करता येईल, याचीही जाणीव ते संबंधितांना करून देत आहेत. स्वतः सजग होऊन इतरांना सजग बनवीत आहेत. पर्यावरणतज्ज्ञांबरोबर अर्थतज्ज्ञांची या विषयातील सजगता ही समाजाला सुपंथाकडे नेणारी ठरू शकेल, अशी आशा करता येईल. समाजाला सुपंथाकडे नेण्याचे काम नेतृत्वाने करायचे

असते. समाजाचे, देशाचे आणि जगाचे नेतृत्व यासाठी महत्त्वाचे ठरते. नेतृत्व करणा-या व्यक्तीच्या/व्यक्तींच्या, राष्ट्राच्या/राष्ट्रांच्या ठायी बदलती वा नवी मूल्ये रुजलेली असली पाहिजेत. नेतृत्वाने ही मूल्ये स्वीकारली आहेत किंवा नाही हे तपासण्याचे काम अभ्यासकांनी आणि समाजाने करायला हवे. तसे झाल्याचे दिसत नसल्यास नेतृत्वाची कानउघडणी करण्याचे वा सुपंथावरून मार्ग आक्रमण्याचा योग्य सल्ला देण्याचे कामही समाजाने करायला हवे. आजमितीस जगाचे नेतृत्व करणा-या अमेरिकेला असा सल्ला अलीकडेच काही अभ्यासकांनी दिलेला आहे. नेतृत्व करण्यासाठी अनेकदा सहकार्याची भूमिका स्वीकारणे अत्यावश्यक बनते, तर कधीकधी नेतृत्व 'शेअर'ही करावे लागते. कारण, त्यातून परस्परसहकार्याची भूमिका दृग्गोचर होत असते. केवळ जागतिक स्तरावरच हे घडते आहे, असे समजण्याचेही कारण नाही. भारतासारख्या संघराज्यीय व्यवस्थेत केंद्रीय सत्ता आणि विविध राज्यांच्या ठायी विभागलेली सत्ता यांच्यातील सत्तातोलालाही 'शेअरिंग'च्या भावनेचे अस्तर हे असतेच. त्या अस्तराची जाणीव ज्या वेळी क्षीण होते त्या वेळी प्रादेशिक भावभावना आणि अस्मितांचे पीळ आपापले अस्तित्व प्रकटपणे दाखवू लागतात. भारतातील प्रादेशिक पक्षांच्या स्थापना व विस्ताराची पाळेमुळे याच वास्तवात रूजलेली सापडतील. हे 'शेअरिंग'ही स्थळकाळपरत्वे वेगवेगळे रूप धारण करत असते. मोठी शहरे आणि त्यांच्या आश्रयाने बहरलेली उपनगरे यांच्यादरम्यान आज ज्या प्रकारचे आदानप्रदान सुरू आहे, त्याद्वारे या वास्तवाची प्रचिती येते. विशेषतः, अमेरिकी शहरे आणि उपनगरांमधील परस्परनात्याच्या संदर्भात आज या 'शेअरिंग'ला एक वेगळाच सांस्कृतिक-सामाजिक अर्थ प्राप्त होऊ पाहत आहे. मुख्य शहराच्या झालर क्षेत्रातील नागरी वाढविस्तार, हा 'उपनगर' या संज्ञेचा पारंपरिक अर्थ आजच्या उपनगरांना तसाच्यातसा लागू पडताना दिसत नाही. शहरांची अनेक वैशिष्ट्ये आज उपनगरे 'शेअर' करत असल्याचा अमेरिकेतील अनुभव आहे. बदलाची ही प्रक्रिया आज ठायीठायी वेगवेगळ्या स्वरूपांत विविधांगी आयामांनिशी साकारते आहे. तिच्या अनुषंगाने विकसित होत असलेल्या विचारमंथनाचे काही पैलू पुढील पानांत मांडलेले आहेत. ■■

# सारे काही पर्यावरणासाठी

संपूर्ण जगात पर्यावरणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वातावरणातील बदल, पृथ्वीचे वाढते तापमान, पर्यावरणाची हानी इत्यादी विषय आता केवळ पर्यावरणवाद्यांचे राहिलेले नाहीत. इतरही विषयांतील अभ्यासक या विषयाच्या अनेकानेक बाजू समजावून घेऊन त्यावर उपाय सुचवित आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवरील अर्थतज्ज्ञ यात सहभागी झाले आहेत. 'जागतिक बँकेचे प्रमुख अर्थतज्ज्ञ' हे पद भूषविलेले निकोला स्टर्न यांनी तर $E^3$ = Efficiency, Effectiveness, Equity या त्रिसूत्रीचा अवलंब करून या संदर्भात नेमके काय करता येईल, हे स्पष्ट केले आहे. डिसेंबर २००९मध्ये कोपनहेगन येथे या संदर्भात होणा-या आंतरराष्ट्रीय परिषदेत या त्रिसूत्रीवर मतैक्य होऊन सर्व देशांनी कृतिशील व्हावे, यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

निकोला स्टर्न हे लंडनस्थित अर्थतज्ज्ञ. जर्मनीतील नाझी राजवटीमुळे त्यांच्या वडिलांनी जर्मनीतून बाहेर पडून ब्रिटनमध्ये आश्रय घेतला. ब्रिटनमध्ये स्थायिक झाल्यानंतर त्यांचे वडील Labour councillor होते. कौटुंबिक पार्श्वभूमीमुळे निकोला स्टर्न यांच्या मनात सामाजिक न्यायाची जाणीव बालपणापासून रुजत गेली. भारतासारख्या विकसनशील देशातील एका खेड्याच्या विकासाचा अभ्यास त्यांनी अनेक वर्षे केला. पर्यावरणाच्या प्रश्नाने गंभीर रूप धारण केल्यानंतर त्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या १५ अर्थतज्ज्ञांच्या अभ्यासगटाने वातावरणातील बदल व त्याचा अर्थशास्त्राशी असलेला संबंध या विषयाचा अभ्यास केला. ऑक्टोबर २००६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'द स्टर्न रिव्ह्यू ऑन द इकॉनॉमिक्स ऑफ क्लायमेट चेंज' या अभ्यासाने, ढासळत्या पर्यावरणाविषयी चिंता व्यक्त केली आणि या संबंधी त्वरित उपाययोजना करण्याचे आवाहनही केले. वातावरणातील बदलाची दखल घेऊन वेळीच उपाययोजना केली तर या बदलामुळे होणा-या हानीचे प्रमाण बरेच कमी होऊ शकेल, असे या अभ्यासातून स्पष्ट करण्यात आले होते. त्यामुळे वेगवेगळ्या देशांमधील धोरणकर्ते आणि उद्योजक यांना योग्य कृती करण्याची दिशा निश्चित करता आली.

पर्यावरणवाद्यांनी या अभ्यासाचे स्वागत केले. तथापि, काही विद्यापीठांतील अर्थतज्ज्ञांनी या अभ्यासावर टीका केली. त्यांत Richard Tol, William Nordhaus,

Nigel Lawson इत्यादींचा समावेश होतो. पण या टीकेमुळे विचलित न होता स्टर्न आपले काम पुढे नेत आहेत. सध्या Grantham Research Institute on Climate Change and Environment या संस्थेच्या अध्यक्षपदाचा कार्यभार सांभाळत आहेत. 'ब्लू प्रिंट फॉर अ सेफर प्लॅनेट' या पुस्तकासाठी त्यांचे लिखाण चालू आहे. शिवाय, विविध देशांच्या धोरणकर्त्यांबरोबर आपल्या कृतिकार्यक्रमाची चर्चा ते करीत आहेत. कारण, यापूर्वी डिसेंबर २००७ मध्ये बाली येथे या विषयावर झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत, २००९च्या कोपनहेगन परिषदेत काही ठोस उपाययोजना मांडण्यात येऊन त्यावर त्वरित कृती करावी, याबाबत मतैक्य झाले आहे. या पार्श्वभूमीवर कोपनहेगन येथे या विषयावर होणा-या आंतरराष्ट्रीय परिषदेत निकोला स्टर्न यांच्या भूमिकेला महत्त्व प्राप्त होणार आहे.

**पर्यावरण महत्त्वाचेच**

स्टर्न यांच्या अभ्यासाला ऑक्टोबर २००८मध्ये दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. गेल्या दोन वर्षांत विविध देशांमध्ये या विषयाची प्रगती कसकशी झाली आणि त्यानुसार स्टर्न यांच्या भूमिकेत काही बदल घडून आले का ? स्टर्न यांच्या मते या अभ्यासानंतर राजकीय नेते पर्यावरणाचा विचार अधिक गांभीर्याने करू लागले. यापूर्वी पर्यावरण व विज्ञान विषयांतील अनेक अभ्यास वातावरणातील बदलाबाबत सातत्याने काळजी व्यक्त करीत होते. काही देशांनी या काळजीची दखलही घेतली होती. पण तरीही ठोस काही घडताना दिसत नव्हते. कारण, या बाबतीत कठोर निर्णय घेण्याची राजकीय इच्छाशक्तीच नव्हती. पर्यावरणाच्या हानीमुळे मानवाचे अस्तित्वच धोक्यात येऊ शकते याची जाणीव होत नव्हती वा होत असली तरी आर्थिक विकासाच्या मागे धावणारे सर्वच जण त्याकडे दुर्लक्ष करीत होते. पण विज्ञानाच्या मदतीला अर्थशास्त्रीय अभ्यासाचीही जोड मिळाली आणि त्याचे गांभीर्य वाढले.

पर्यावरणाच्या रक्षणासाठी असलेला 'क्योतो प्रोटोकॉल' अमेरिकेने मंजूर केलेला नाही. पण आता अमेरिकेच्या भूमिकेत बदल होत आहे. मानवी व्यवहार (औद्योगिक विकास, आधुनिक मानवाची जीवनशैली) आणि वातावरणातील बदल यांच्यात परस्परसंबंध आहे, असे अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी गेल्या वर्षी प्रथमच मान्य केले. पर्यावरणाला घातक असलेले हरितगृह वायू वातावरणात प्रवेश करू नयेत यासाठी २०५० पर्यंत अशा वायूंचे उत्सर्जन ७० टक्क्यांनी कमी करण्याबाबतचा प्रस्ताव अमेरिकेच्या सिनेटसमोर दाखल झाला. अर्थात, अद्याप तो मंजूर झालेला

नाही. पण अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीनंतर २००९ मध्ये तो पुन्हा उपस्थित होण्याची दाट शक्यता आहे. कारण, अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या रिंगणात असलेले दोन्ही उमेदवार - बराक ओबामा व जॉन मॅक्केन यांनी या विषयाला अनुकूलता दर्शविली आहे. पर्यावरणाला घातक ठरणा-या वायूंचे उत्सर्जन २०५० पर्यंत ५० टक्क्यांनी घटविण्याचा निर्णय 'जी-आठ' गटातील राष्ट्रांनी गेल्या वर्षी जूनमध्ये घेतला आहे. पर्यावरण रक्षणाच्या विरोधात भूमिका घेणा-या जॉन हॉवर्ड यांना ऑस्ट्रेलियाच्या जनतेने नाकारले आणि केविन रूड यांना पंतप्रधानपदी निवडून दिले. रूड यांनी 'क्योतो प्रोटोकॉल'वर स्वाक्षरी केली आहे. चीननेदेखील पर्यावरणविषयक कृतिकार्यक्रम जाहीर केला असून भारतही त्याच मार्गाने जाण्याच्या प्रयत्नांत आहे.

पर्यावरणाचा अभ्यास आता सर्वांना विचारात घ्यावा लागतो आहे. पर्यावरणविषयक विविध अभ्यासांमधून असे दिसून येत आहे की सर्व देशांमधील माणसांचे व्यवहार आहेत तसेच चालू राहिले तर वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण ७५०-८००पीपीएम (पार्टस् पर मिलियन) इतके होईल. आजघडीला हे प्रमाण ४३० पीपीएम तर, औद्योगिकीकरणाच्या आधी ते २८० पीपीएम इतके होते. या वाढीमुळे पृथ्वीचे तापमान ४ ते ५ अंश सेल्सिअसने वाढण्याची शक्यता आहे. यामुळे संपूर्ण जगात पर्यावरणविषयक विविध प्रकारच्या समस्या उभ्या ठाकण्याची शक्यता आहे. अर्थतज्ज्ञांनी सुरुवातीला ही बाब गांभिर्याने घेतली नाही. पण 'इंटरनॅशनल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज'ने (आयपीसीसी) वातावरणातील हरितगृह वायूंच्या प्रमाणात झालेली वाढ काळजी करावी अशीच आहे, असे स्पष्ट केल्याने हे प्रमाण कमी करण्याशिवाय दुसरा पर्याय राहिलेला नाही, हे आता त्यांना कळून चुकले आहे. तसेच, वातावरणातील कार्बन डायॉक्साईड हा वायू शोषून घेण्याची समुद्राची क्षमताही मर्यादित आहे असे आढळले आहे. त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढण्याची शक्यता अधिकच बळावते. अशा परिस्थितीत, देशोदेशींच्या धोरणांत पर्यावरण हा विषय डोकावणे स्वाभाविकच ठरते. स्टर्न यांच्या मते अर्थशास्त्रासह विविध विषयांतील तज्ज्ञांनी पर्यावरणाचे रक्षण करणारे तंत्रज्ञान वापरण्याच्या धोरणाला पाठिंबा देणे गरजेचे आहे. कारण, पर्यावरणतज्ज्ञ चूक की बरोबर ही चर्चा करण्यापेक्षा असे नवतंत्रज्ञान उपलब्ध होणे गरजेचे आहे. पर्यावरणतज्ज्ञ बरोबर असतील तरी समाजाला हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरेल आणि समजा पर्यावरणविषयक अभ्यास काही प्रमाणात चुकीचे ठरले तरी समाजाजवळ चांगले तंत्रज्ञान असणे हे केव्हाही उत्तमच ठरेल.

**कसे करायचे पर्यावरणाचे रक्षण ?**

पर्यावरणरक्षणाची बांधिलकी मानली तर नेमकी कृती कोणती व ती कशी करायची, या प्रश्नाचे उत्तर स्टर्न यांच्याजवळ तयार आहे. या संदर्भात त्यांनी सहा मार्ग सांगितले आहेत. सर्वच देशांसाठी ते महत्त्वाचे आहेत. पहिला मार्ग आहे कार्बन डायॉक्साईड वायूचे प्रमाण २०५० पर्यंत ५० टक्क्यांनी कमी करण्याचा. म्हणजे, १९९० मध्ये या वायूच्या उत्सर्जनाचे प्रमाण जागतिक पातळीवर जेवढे होते त्या तुलनेत २०५० मधील उत्सर्जनाचे प्रमाण ५० टक्क्यांनी कमी असेल, याची काळजी घेतली जाईल. या उद्दिष्टपूर्तीसाठी विकसित/श्रीमंत देशांना कार्बन डायॉक्साईड वायूचे प्रमाण ८० टक्क्यांनी घटवावे लागेल. असे झाल्यास पृथ्वीचे तापमान ५ अंश सेल्सिअसने वाढण्याची शक्यता अल्प राहील. येथे महत्त्वाचा प्रश्न असा उद्‌भवतो की श्रीमंत देश आपली धोरणे बदलतील का ? याचे उत्तर होकारार्थी देता येईल. कारण फ्रान्सने या वायूचे प्रमाण ७५ टक्क्यांनी घटविण्याचे मान्य केले आहे, तर ब्रिटनने ६० टक्क्यांनी. हे प्रमाण ८० टक्क्यांवर नेण्याच्या प्रस्तावावर ब्रिटनचे सरकार विचार करीत आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी निवडून आल्यास डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार बराक ओबामा यांनी हे प्रमाण ८० टक्क्यांनी कमी करण्याचे तर, रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार मॅक्‌केन यांनी ते ६० टक्क्यांनी कमी करण्याचे मान्य केले आहे. हे ८० टक्के प्रमाण काही विशिष्ट अभ्यासाच्या आधारे निश्चित करण्यात आले आहे. हरितगृह वायूंचे प्रमाण जागतिक पातळीवर २०५० पर्यंत ५० टक्क्यांनी घटवणे क्रमप्राप्त आहे, याचा अर्थ दरवर्षी उत्सर्जित होणा-या हरितगृह वायूचे प्रमाण दरडोई २ टन प्रतिवर्षी इतके भरते. युरोप व जपान येथे हे प्रमाण आज दरडोई १०ते १२ टन एवढे आहे. ८० टक्के घट करणे म्हणजे दरडोई २ टन हे प्रमाण गाठणे होय. या संदर्भात इतर देशांच्या तुलनेत अमेरिकेला अधिक प्रयत्न करावे लागतील, असे स्टर्न यांना वाटते.

दुसरा मार्ग आहे गरीब देशांसाठी. २०५० मध्ये जगाची लोकसंख्या सुमारे ९ अब्ज इतकी असेल असा अंदाज व्यक्त करण्यात येतो. त्यांपैकी विकसनशील/गरीब देशांमधील लोकसंख्या सुमारे ८ अब्ज इतकी असण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांनादेखील दरडोई २ टन हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवावे लागणार आहेच, पण २०२०नंतर त्यांनी या उद्दिष्टपूर्तीकडे जाण्याची योजना कार्यान्वित केली तरी चालू शकेल. तोपर्यंत विकसित देशांचा अनुभवही त्यांच्यासाठी तयार असेल. दरम्यान, पर्यावरण रक्षणासाठी आखण्यात आलेल्या योजनांमधील एक योजना - ‘कार्बन

ट्रेडिंग'ची सोय - सध्या विकसनशील देशांसाठी उपलब्ध आहे (विकसित देशांकडून वातावरणात प्रवेश करणारा कार्बन डायॉक्साईड वायू झाडांकडून शोषला जावा यासाठी विकसनशील देशांनी झाडे लावायची व त्याचा मोबदला म्हणून विकसित देशांनी विकसनशील देशांनी पैसे द्यायचे, याला 'कार्बन ट्रेडिंग' असे म्हणतात). पर्यावरणाचे नुकसान न करणा-या तंत्रज्ञानाची निर्मिती विकसित देशांनी केली की ते तंत्रज्ञानही विकसनशील देशांना उपलब्ध होऊ शकेल. 'कार्बन ट्रेडिंग'चे क्षेत्र खाजगी क्षेत्राला खुले करणे व 'कार्बन ट्रेडिंग' वाढविणे हा स्टर्न यांचा <u>तिसरा मार्ग</u> आहे. 'कार्बन ट्रेडिंग'मुळे विकसनशील देशांकडे पैशाचा ओघ वाढेल व हळूहळू विकसनशील देशांची आर्थिक स्थिती सुधारेल. मग तेही पर्यावरणरक्षणाच्या कृतिकार्यक्रमात ('कार्बन ट्रेडिंग'शिवाय इतर) सहभागी होऊ शकतील. आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध करार करण्यासाठी 'कार्बन ट्रेडिंग'सारखी व इतर अशी काही पावले उचलावी लागतील. <u>चौथा मार्ग</u> आहे जंगलतोड रोखण्याचा. हा मुद्दा तसा जुनाच असला तरी महत्त्वाचा आहे, हे स्टर्न लक्षात आणून देतात. आर्थिक विकासात आणि तंत्रज्ञानात सर्वांना सहभागी करून घेणे हा <u>पाचवा मार्ग</u> आहे. विकासासाठी आर्थिक साहाय्य करण्याची बांधिलकी सर्वांनी मानणे व प्रत्यक्ष तशी कृती करणे, हा <u>सहावा मार्ग</u> स्टर्न मांडतात. 'जी-आठ' गटातील राष्ट्रांकडून गरीब देशांना करण्यात येणा-या मदतीत २००५ ते २०१० या काळात दुपटीने वाढ करण्याचा निर्णय या गटातील राष्ट्रांनी २००५ मध्ये घेतला होता. ही मदत आणखी वाढविण्याची गरज आहे. कारण, विकसित देशांकडून हरितगृह वायूंचे उत्सर्जन अधिक प्रमाणात केले जाते. त्यामुळे पर्यावरणाच्या रक्षणासाठी विकसनशील देशांना मदत करणे, हे एकप्रकारे विकसित देशांचे कर्तव्यच ठरते.

**सहकार्याची भूमिका हवी**

निकोला स्टर्न यांच्या या सर्व योजना आदर्श असल्या तरी प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी कशी होईल, हा फार मोठा प्रश्न आहे. पण स्टर्न त्याबाबत आशावादी आहेत. त्यांच्या मते या योजना महत्त्वाकांक्षी नाहीत, त्या व्यवहार्य आहेत. पण जागतिक राजकारणाचा विचार करता त्या महत्त्वाकांक्षी आहेत, हे खरे. पण धोरणकर्ते हळूहळू या योजनांना अनुकूलता दर्शवीत आहेत. या योजना कागदावर मांडण्यात आल्यानंतर लगेचच अनेक देशांनी त्यांत रस घेतला आहे. काही विकसित आणि विकसनशील देशांनी याचे स्वागत केले आहे. अर्थात, या योजनांची अंमलबजावणी करताना सर्वच देशांना उच्चतम ध्येय पुढे ठेवून त्यासाठी कडक धोरण स्वीकारावे

लागणार आहे. म्हणजे, हरितगृह वायूंचे वातावरणातील प्रमाण कमी करण्यासाठी विकसित देशांना आर्थिक-औद्योगिक धोरणांची दिशा कदाचित बदलावी लागेल. आर्थिक विकासासाठी प्रयत्नशील असणा-या विकसनशील देशांनाही या संबंधीचे कडक धोरण मान्य करावे लागेल. आर्थिक विकासाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी धडपडणा-या विकसनशील देशांची भूमिका बरोबर असली तरी पर्यावरणाच्या रक्षणात त्यांना सहभागी व्हावे लागणार आहेच. दरम्यान, कार्बन डायॉक्साईड वायूचे उत्सर्जन कमी करूनही आर्थिक विकास कसा साधता येईल, याचे उदाहरण विकसित देशांना विकसनशील देशांसमोर मांडता येईल. विविध प्रकारच्या उपाययोजना राबविताना काही अडचणी येणारच, ही वस्तुस्थिती स्टर्न नाकारत नाहीत. पण या अडचणींना सामोरे जावे लागेल व त्यावर उत्तरे शोधावी लागतील, असे त्यांना वाटते. उदाहरणार्थ, 'क्योतो प्रोटोकॉल'प्रमाणे 'क्लीन डेव्हलपमेंट मेकॅनिझम'(CDM) राबविताना काही अडचणी आल्या तरी असे काही मार्ग उभयपक्षी मान्य करावे लागतील, असे मत ते मांडतात.

तेलाची भाववाढ झाल्याने दैनंदिन जीवनातील तेलाचे विविध उपयोग करण्यावर निर्बंध येत आहेत, हे एक प्रकारे पृथ्वीचे वाढते तापमान रोखण्यासाठी साहाय्यकारी ठरत आहे. पण, दुस-या बाजूने हा मुद्दा (पृथ्वीचे वाढते तापमान) केवळ तात्पुरता नाही, हेही समजून घेण्याची गरज आहे. यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची गरज आहे. अशा उपाययोजना आखताना करवाढीचाही विचार स्वाभाविकपणे होईल. काही गोष्टींवरील कर वाढेल तसा काही गोष्टींवरील कर कमी होईल, हे येथे समजून घेतले पाहिजे. पृथ्वीच्या वाढत्या तापमानाचा प्रश्न मानवसमूहांच्या अस्तित्वाचा प्रश्न ठरणार आहे, या दृष्टीने याचा विचार करायला हवा. राजकीय नेते, उद्योजक व सामान्य नागरिक या सर्वांनीच या प्रश्नाकडे गंभीरपणे बघितले पाहिजे. हरितगृह वायूंचा वातावरणातील प्रवेश रोखणे ही याची एक बाजू झाली. पण, एकूणच निसर्गाकडून आपण जेवढे काही मिळवितो त्याचे खरे आर्थिक मूल्य जाणून घेतले पाहिजे. जर्मनीतील पर्यावरणखात्याचे मंत्री असे मूल्य जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. असे प्रयत्न महत्त्वाचे ठरावेत.

पृथ्वीचे वाढते तापमान रोखण्यासाठी वेळीच पावले उचलणे गरजेचे आहे आणि यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारण बाजूला ठेवून सर्वांना सहकार्याचे धोरण स्वीकारावे लागेल. म्हणूनच कोपनहेगन येथे होणा-या परिषदेसाठी सर्व देशांमधील धोरणकर्त्यांची भूमिका सहकार्याची असावी, यासाठी स्टर्न प्रयत्नशील आहेत. त्यांना यश मिळेल अशी आशा करता येईल. ■■

# सहकार्यातून नेतृत्व

'बळी तो कान पिळी' या म्हणीचे प्रत्यंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात पदोपदी येते. सर्वशक्तिमान असलेला देशच जगाचे नेतृत्व करू शकतो, असे सामान्यतः मानले जाते. आंतरराष्ट्रीय पातळीवर सत्तेचा, नेतृत्वाचा विचार करताना कोणत्याही देशाची 'हार्ड पॉवर' व 'सॉफ्ट पॉवर' महत्त्वाची ठरते. देशाची आर्थिक स्थिती लष्करसज्जता, लोकसंख्या अशा काही बाबी 'हार्ड पॉवर'मध्ये मोडतात. तर, समृद्ध संस्कृती, वैचारिक वारसा, नीतिमूल्यांचा ठेवा, सांस्कृतिक परंपरा इत्यादी बाबी 'सॉफ्ट पॉवर'मध्ये मोडतात. नेतृत्वासंदर्भात लक्षात घेण्यासारखा आणखी एक मुद्दा असा की, आंतरराष्ट्रीय पातळीवर एखाद्या देशाने नेतृत्व करणे ही एक राजकीय प्रक्रिया असते. नेता/नेते, त्याचे/त्यांचे अनुयायी आणि ज्या समाजात, देशात हे दोघेही कार्य करीत असतात तेथील विविध मुद्द्यांचे संदर्भ या तीन बाबी या प्रक्रियेत महत्त्वाच्या ठरतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात एकोणिसाव्या शतकात ब्रिटनच्या नेतृत्वाची तर, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेच्या नेतृत्वाची चर्चा होती. चालू शतकात या संदर्भात काय चर्चा आहे ?

अमेरिकेने जगाचे नेतृत्व करावे किंवा नाही, हा बरेचदा वादग्रस्त मुद्दा ठरत असला तरी चालू शतकाच्या सुरुवातीस अमेरिका 'सुपरपॉवर' बनून जगावर वर्चस्व गाजवते आहे ही वस्तुस्थिती आहे. आता देशोदेशींचे राजकारण अतिशय गुंतागुंतीचे बनत चालले आहे. अनेकविध मुद्द्यांचा प्रवेश राजकारणात होऊ लागलेला आहे. त्यामुळे नेतृत्व करणा-या देशांनाही आपल्या भूमिकेत बदल घडवून आणणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे अमेरिकेने काय करावे, काय करू नये वा कोणत्या वेळी कोणती भूमिका घ्यावी, याची चर्चा अभ्यासकांमध्ये चालू आहे. अमेरिकेच्या नेतृत्वाबाबत अनेक प्रकारची मते मांडण्यात येतात. एकविसाव्या शतकात अमेरिकेने जगाचे नेतृत्व करताना कोणत्या बाबी विचारात घेतल्या पाहिजेत, या प्रश्नाचा ऊहापोह करण्याआधी काही गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत. काही अभ्यासकांच्या मते एकविसाव्या शतकात अमेरिका 'सुपरपॉवर' असेलच असे नाही. अमेरिकेच्या स्पर्धेत चीन उतरेल असे

त्यांना वाटते. पण तसे होणे कठीण आहे. समजा, चीनने आपला आर्थिक विकासाचा वार्षिक दर सरासरी नऊ टक्के इतका कायम राखला आणि अमेरिकेचा हा दर २ ते ३ टक्के इतका कमी राहिला तरी चालू शतकात, दरडोई उत्पन्नात, अमेरिकेची बरोबरी चीन करू शकणार नाही. अमेरिकेपुढे आव्हान उभे करणे भारतास शक्य आहे, असे काही अभ्यासकांना वाटते. पण भारताची आर्थिक बाजू पाहता ते शक्य होईल, असे नाही, असे काहींना वाटते. कुणी रशियाच्या पारड्यात झुकते माप टाकतात तर कुणी रशिया -चीन -भारत हे त्रिकुट अमेरिकेसमोर आव्हान उभे करेल, असे म्हणतात. पण गेल्या काही वर्षांत केवळ ऊर्जेमुळे -तेलामुळे - रशियाचे महत्त्व वाढलेले आहे, अन्यथा रशियात अंतर्गत प्रश्न बरेच आहेत. युरोपीय महासंघात सहभागी झालेल्या देशांची एकत्रित ताकद अमेरिकेला आव्हान देऊ शकेल, असाही अंदाज व्यक्त करण्यात येतो. पण या सगळ्या देशांमधील नेतृत्वाची इच्छाशक्ती, आर्थिक-राजकीय-सामाजिक प्रश्न इत्यादी अनेक बाबी या संदर्भात महत्त्वाच्या ठरतात.

**चालू शतकातील सत्तास्थाने**

नेतृत्वाबाबत अमेरिकेला पर्याय ठरू शकेल, अशा देशाचा/देशांचा विचार करताना या शतकातील बदललेली परिस्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे. तसेच, इतर देशांच्या तुलनेत अमेरिकेची बाजू का व कशी वरचढ आहे, हेही समजून घेतले पाहिजे. आज अमेरिकेचे लष्कर, नौदल आणि हवाई दल नवनवीन तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. अमेरिकेकडे मोठ्या प्रमाणावर अण्वस्त्रे आहेत. अमेरिकेची व्यूहरचना लष्करातील माहितीआधारित क्रांतीवर बेतलेली आहे. लष्करविषयक खर्च करण्यात अमेरिका आघाडीवर आहे. थोडक्यात, 'हार्ड पॉवर'चा विचार करता अमेरिकेने आघाडी घेतली आहे. 'सॉफ्ट पॉवर'च्या संदर्भात असे आढळते की, मनोरंजनाच्या क्षेत्रात अमेरिका पुढे आहे. इतर देशांच्या तुलनेत परदेशी विद्यार्थी मोठ्या संख्येने अमेरिकेकडे आकर्षित होतात. ऊर्जानिर्मितीसाठी लागणा-या साधनसामग्रीच्या उत्पादनातही अमेरिका आघाडीवर आहे. पण 'हार्ड व सॉफ्ट' अशी दोन्ही प्रकारची 'पॉवर' काही अंशी वा ब-याच प्रमाणात असणे म्हणजे त्या देशाला सर्व काही आपल्या इच्छेप्रमाणे करणे शक्य असते, असे मानणे बरोबर नाही. कारण, व्यवहारात तसे घडतेच असे नाही.

जागतिक राजकारणाचा विचार करताना एक गट 'हे जग एककेंद्री आहे' असे म्हणतो, तर दुसरा गट 'हे जग बहुकेंद्री आहे', असे म्हणतो. पण ही दोन विधानेही तपासून घेतली पाहिजेत. पहिल्या गटाने हे ध्यानात घेतले पाहिजे की,

त्यांच्या मते जग 'एककेंद्री' म्हणजे 'अमेरिकाकेंद्री' असते तेव्हादेखील अमेरिका इतर देशांना आपल्या इच्छेप्रमाणे करण्यास भाग पाडू शकतेच असे नाही. तसेच, दुस-या गटाने हे समजून घेतले पाहिजे की, जग 'बहुकेंद्री' असते तेव्हादेखील त्या अनेकांच्या इच्छेप्रमाणे अनेक व्यवहार घडून येतातच असे नाही. असे घडते कारण, संबंधित देशांमधील त्या त्या वेळची परिस्थिती भिन्न असते. आर्थिक-राजकीय-सामाजिक संदर्भ येथे महत्त्वाचे ठरतात. या पार्श्वभूमीवर चालू शतकातील नेतृत्वाचा विचार जाणून घेता येतो.

जागतिक राजकारणात महत्त्वाची ठरलेली 'पॉवर' आज अनेक देशांमध्ये विखुरली गेलेली दिसते. याचा अधिक सखोल विचार करण्यासाठी कल्पनाशक्तीला थोडा ताण देता येईल. म्हणजे, त्रिमिती पद्धतीने बुद्धिबळाचा डाव (three-dimensional chess game) कसा दिसेल तसे काहीसे चित्र डोळ्यांपुढे उभे करून याचा विचार करता येईल. या डावाकडे वरच्या बाजूने पाहिले तर लष्करी सत्ता प्रथम दिसते आणि ती एककेंद्री आहे. मधल्या पातळीवर विविध देशांची आर्थिक सत्ता स्थान मिळवून आहे आणि ती बहुकेंद्री आहे. अमेरिका, युरोप आणि जपान हे यात आघाडीवर असले तरी चीनचाही प्रवेश तेथे झालेला दिसतो. या पातळीवर अमेरिका या एकाच देशाचे साम्राज्य नाही तर त्याला इतर देशांबरोबर समंजसपणे व्यवहार करावे लागतात. तळाच्या पातळीवर अशा अनेक बाबी दिसतात की ज्या विविध देशांच्या सरकारांच्या नियंत्रणाबाहेर आहेत. वित्तीय संस्थांचा अवाढव्य पसारा, काळ्या बाजारातील उलाढालींच्या मदतीने घडून येणारा दहशतवाद्यांचा शस्त्रात्रांचा चोरटा व्यापार आणि इंटरनेटद्वारे घडणा-या घडामोडींमध्ये व्यत्यय आणणा-या 'हॅकर्स'चे काम यांचा समावेश यात करता येईल. पृथ्वीचे वाढते तापमान व पर्यावरणविषयक इतर प्रश्न, लाखो लोकांच्या मृत्यूला कारणीभूत ठरणारे साथीचे आजारही येथे दिसतात. या घटनांमुळे सर्व देशांची सुरक्षा धोक्यात येऊ शकते. वरच्या पातळीवर बळकट असलेली 'हार्ड पॉवर'या धोक्याचा सामना करायला पुरेशी ठरत नाही. शिवाय, तळाच्या पातळीवरील सत्ता विविध देशांमध्ये विभागली गेली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचा व नेतृत्वाचा विचार करताना 'एककेंद्री', 'बहुकेंद्री' वा 'अमेरिकेचे साम्राज्य' असे शब्दप्रयोग करणे एक प्रकारे निरर्थकच ठरते. महत्त्वाचे म्हणजे, सुरक्षाविषयक सर्वांत मोठे आव्हान या तळाकडूनच उभे ठाकले आहे. असे असले तरी आजघडीला 'हार्ड पॉवर' व 'सॉफ्ट पॉवर'च्या दृष्टीने अमेरिका हा एक बलाढ्य देश आहे, ही वस्तुस्थिती

आहे. मात्र, चालू शतकात अमेरिकेसमोर आव्हान उभे करण्याचा प्रयत्न होऊ शकतोच. येथे लक्षात घेण्यासारखी एक बाब अशी की रशिया, चीन आणि भारत या देशांचे प्राधान्यक्रम वेगवेगळे आहेत. त्यामुळे हे तीन देश एकत्र येऊन अमेरिकेसमोर आव्हान उभे करण्याची शक्यता कमी वाटते.

अमेरिकेबाबत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अमेरिकेची 'सॉफ्ट पॉवर' ही इराकवर आक्रमण केल्याने घसरणीला लागली. अमेरिकेची संस्कृती व मूल्ये यांना लोकांनी नाकारलेले नसले तरीदेखील नेतृत्वाचा आणि सुरक्षेचा मुद्दा लक्षात घेता अमेरिकेला पुढील धोरणे आखताना सर्वंकष विचार करून इतर देशांबरोबर सहकार्याचे धोरण स्वीकारणे गरजेचे ठरू शकेल. कारण, माहिती तंत्रज्ञानातील क्रांती आणि सर्व देशांना कवेत घेणारी जागतिकीकरणाची प्रक्रिया यांमुळे जगासमोर वेगवेगळी आव्हाने उभी ठाकत आहेत. याच दोन बाबींमुळे चालू शतकाच्या सुरुवातीला अमेरिकेची 'पॉवर' वाढलेली दिसत होती. पण तंत्रज्ञानाचा प्रसार फार वेगाने होऊ लागलेला आहे/झालेला आहे. त्यामुळे या संदर्भातील अमेरिकेच्या स्थानाला नजीकच्या भविष्यात धक्का बसण्याच्या शक्यता मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या आहेत. उदाहरणार्थ, इंटरनेट वापरणा-या नागरिकांच्या संख्येत दिवसागणिक भर पडत आहे. त्यामुळे इंटरनेट वापरणारी आशियातील ही 'सायबर कम्युनिटी' संख्यात्मकदृष्ट्या बळकट होऊन अमेरिकेला लवकरच मागे टाकेल, असा अंदाज व्यक्त करण्यात येतो. शिवाय, इंटरनेटच्या वापरामुळे देशोदेशींच्या सीमा व भौगोलिक अंतर केव्हाच अप्रस्तुत ठरले असून विविध विषयांशी संबंधित नागरिकांच्या 'व्हर्च्युअल संघटना' आकाराला येत आहेत. जणू या इंटरनेटवरील स्वयंसेवी संस्थाच असतात (दहशतवादी संघटनाही या प्रकारात मोडतात). शिवाय, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे जाळे अनेकानेक देशांत विखुरलेले आहेच. म्हणजे, सरकारच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या असंख्य घडामोडींमुळे विविध देशांमधील सरकारे वेगवेगळ्या मार्गांनी अडचणीत येऊ शकतात. तंत्रज्ञानामुळे 'जागतिक नागरिकां'च्या हाती 'पॉवर' पोहचू लागली आहे. जागतिक हिताचा विचार करता ही 'पॉवर' चांगल्या अथवा वाईट मार्गाने जाऊ शकते. इंटरनेटच्या माध्यमातून दहशतवादी सक्रिय बनत आहेत, हे, ही 'पॉवर' वाईट मार्गाला गेल्याचे एक उदाहरण आहे. दहशतवाद्यांनी छेडलेल्या युद्धामुळे 'युद्धाचे खाजगीकरण' झाले आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यामुळे अमेरिकेची 'हार्ड पॉवर' व 'सॉफ्ट पॉवर' चांगली असूनही अमेरिकेला अनेक निर्णय आपल्या इच्छेप्रमाणे घेता येतील व तशी कृती करता येईल असे नाही.

**सहकार्याचे धोरण गरजेचे**

आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध आव्हानांचा विचार करता असे दिसून येते की येथून पुढे कोणताही देश एकटा एखाद्या प्रश्नाला सामोरा जाऊ शकणार नाही. अमेरिकासुद्धा याला अपवाद ठरणार नाही. किंबहुना, विविध आव्हाने पेलण्यासाठी अमेरिकेने पुढाकार घेऊन सर्व देशांना एकत्र आणण्याचे धोरण आखले पाहिजे. जगावर वर्चस्व गाजविण्याच्या भूमिकेतून अमेरिका बाहेर पडली आणि तिने ख-या अर्थाने जगाच्या हिताचे मुद्दे उचलून धरले तर अमेरिकेच्या नेतृत्वाला विरोध होईल, असे अभ्यासकांना वाटत नाही. अमेरिकेला जर जगाचे नेतृत्व करायचे असेल तर इतर राष्ट्रांबरोबर सहकार्याचे धोरण आखून त्रिमिती पद्धतीच्या बुद्धिबळाच्या डावातील तिस-या पातळीवरील प्रश्न कसे सोडविता येतील यासाठी कृतिशील बनावे लागेल. यासाठी अमेरिकेला काय करता येईल ?

जगाच्या हिताचे म्हणजे काय व जगाच्या हिताच्या बाबी नेमक्या कोणत्या ते सर्वप्रथम समजून घ्यावे लागेल. सर्व देशांसाठी सर्व काळ उपयोगी असणारे विषय हे जगाच्या हिताचे आहेत, असे म्हणता येईल. अशी जागतिक हिताची भूमिका सर्व देशांना व्यवहारात घेता आली पाहिजे, असेही अपेक्षित आहे. खुला व्यापार, वित्तीय बाजारात स्थैर्य, शेजारी राष्ट्रांबरोबर शांततापूर्ण संबंध, जगाच्या पाठीवर कोठेही समुद्रामार्गे व्यापारविषयक वाहतूक करण्याची मोकळीक, दहशतवादी घटनांचा बीमोड आणि साथीच्या रोगांपासून मुक्तता असे काही विषय हे जागतिक हिताचे ठरू शकतील. अर्थात, आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये दरवेळी एका देशासाठी जे हिताचे ठरणारे असते ते दुस-या देशासाठीही हिताचे ठरणारे असतेच असे नाही. पण काही विषय याला अपवाद ठरत असतातच. उदाहरणार्थ, दहशतवाद, साथीच्या रोगांचा नायनाट, स्वच्छ हवा इत्यादी. शिवाय जे विषय काही प्रमाणात वादग्रस्त ठरणारे असतात त्या संदर्भात चर्चा करण्याचा मार्ग स्वीकारता येतो. असे विषय एकदम बाजूला सारणे उचित ठरत नाही. किंबहुना, अशा वादग्रस्त विषयांच्या सोडवणुकीसाठी अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाने पुढाकार घेणे, हीच बाब प्रभावी जागतिक नेतृत्वासाठी आवश्यक व उचित कृती मानता येईल. असे विषय सोडविण्यासाठी वेगळ्या प्रकारच्या गुंतवणुकीची गरज असते. सामान्यपणे अमेरिकी नागरिक अशा प्रकारच्या गुंतवणुकीच्या बाजूने कल दर्शवितात असे नाही. अनेकदा अशा विषयांच्या सोडवणुकीसाठी लष्कराचे प्रयत्न उपयुक्त ठरण्याची शक्यता अल्प असते, हेही येथे ध्यानात घेतले पाहिजे.

चालू शतकाचा विचार करता, आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वाच्या ठरलेल्या विषयांमध्ये जागतिक व्यापाराबरोबरच अण्वस्त्रप्रसारबंदी करार, पर्यावरणविषयक विविध प्रश्न, मानवाधिकार, देशादेशांमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी कार्य अशा काही विषयांचा समावेश होतो. या संबंधीचे प्रश्न सोडविण्यासाठी अमेरिकेने पुढाकार घेणे अपेक्षित आहे. जागतिक नेतृत्व सिद्ध करायचे असेल तर अमेरिकेची ती जबाबदारीही ठरते. विकसनशील देशांमधील आरोग्य, शिक्षण, गरिबी व राजकीय अस्थैर्य इत्यादी विषयांकडे अमेरिकेने गांभीर्याने बघितले पाहिजे. या देशांमधील अस्थिरतेमुळे जागतिक पातळीवर अशांतता निर्माण होऊ शकते, हे अमेरिकेने लक्षात घेऊन योग्य कृती करण्याची गरज आहे. असे विषय समर्थपणे हाताळण्यासाठी अमेरिकेने कसोशीने प्रयत्न केल्याचे दिसत नाही. उलटपक्षी, जागतिक व्यापारविषयक प्रश्न निर्माण झाले तेव्हा अमेरिकेने स्वतःच्या हिताचे रक्षण करून गरीब देशांच्या विरोधात भूमिका घेतली. देशादेशांमध्ये संघर्षाचे प्रश्न निर्माण होतात तेव्हा अमेरिकेने ती परिस्थिती अधिक गंभीर न होऊ देण्याचे प्रयत्न करायला हवेत. जगाचे नेतृत्व करताना वेळप्रसंगी नेतृत्व 'शेअर'ही करावे लागते, हेही अमेरिकेने ध्यानात घेण्याची गरज आहे.

जागतिक नेतृत्वाचा विचार करता चालू शतकात अमेरिकेसमोर इतर देशांचे आव्हान उभे ठाकेल असे नाही. अर्थात, अमेरिका जगाचे नेतृत्व करू शकेल, हे विधान अभ्यासकांनी काही गृहीतकांच्या आधारे केले आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था बळकट राहील, अमेरिकेच्या 'हार्ड' व 'सॉफ्ट पॉवर'मध्ये फारशी घट होणार नाही, आपल्या बळामुळे अमेरिका शेफारून जाऊन जगाला तुच्छ लेखणार नाही व मुजोर/गर्विष्ठ बनणार नाही, अमेरिका केवळ आपल्या स्वार्थाचा विचार न करता जगाचे हित जपण्याचा दृष्टिकोण स्वीकारेल ही ती गृहीतके होत. यांतील प्रत्येक गृहीतकावर प्रश्नचिन्ह उमटू शकते, हे अभ्यासक मान्य करतात. पण या गृहीतकांचा आधार घेतला तरच चालू शतकातील अमेरिकेच्या नेतृत्वाबाबत काही मते मांडणे शक्य होऊ शकते हेही खरे आहे.

जगाचे नेतृत्व नेमके कुठे , केव्हा व कसे करायचे हे अमेरिकेने ओळखले पाहिजे. अमेरिकेसमोर आव्हान आहे ते नेमके याचेच. म्हणजे 'हार्ड' व 'सॉफ्ट पॉवर'बरोबरच या दोन्हींना एकत्र आणण्यासाठी सहकार्याचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या 'स्मार्ट पॉवर'चा विचार अमेरिकेला करावा लागणार आहे. ■■

# कथा पुसटत्या सीमारेषांची ...

लग्न होऊन अनेक वर्षे लोटल्यानंतर पति-पत्नी परस्परांसारखे दिसावयास लागतात, असे म्हटले जाते. हे विधान, अर्थातच, वाच्यार्थाने घ्यायचे नाही. संसारातील सहजीवनाचा प्रदीर्घ कालावधी लोटल्यानंतर पति-पत्नी एकमेकांच्या स्वभावातील अगणित कंगो-यांची कळत-नकळतच इतकी देवाणघेवाण करत असतात, की लग्नानंतरच्या पहिल्या काही वर्षांत प्रकर्षाने जाणवणारे स्वभावातील टोकदार भिन्नत्व काळाच्या ओघात मवाळ होऊन यथावकाश त्यांच्या अंतर्मनांची वीण पार एकजीव होऊन जाते, हे या वाक्यातील सार. व्यक्तिजीवनातील हा संकेत सामाजिक जीवनातील काही पैलूंनाही बहुधा लागू पडत असावा. विशेषतः, अमेरिकेतील प्रचलित शहरी वास्तवातील काही घडामोडींवरून तरी तसा निष्कर्ष काढण्यास काही प्रत्यवाय नसावा. खास करून, फिलाडेल्फिया, शिकागो, डेट्रॉइट, अटलांटा यांसारखी महानगरे आणि या नगरा-महानगरांच्या परिघावर गेल्या अर्धशतकभरात बहरलेली उपनगरे यांच्यातील परस्पर नात्यामध्ये आताशा जे मूलगामी स्वरूपाचे बदल घडून येत आहेत, त्यांवरून तर शहर आणि उपनगरे यांच्यातील पृथकपण, हे पृथकपण अधोरेखित करणा-या भौतिक, सांस्कृतिक सीमारेषा क्रमाने पुसट बनत जाऊन मूळ महानगर आणि त्याच्या परिसरातील उपनगरे यांचा तोंडवळा एकसारखाच बनत असल्याचा अनुभव येतो आहे. केवळ इतकेच नाही तर, नगरे आणि उपनगरे एक प्रकारे जणू परकायाप्रवेशच करत आहेत की काय, अशी शंका येऊ लागली आहे ! गेल्या सुमारे ५० वर्षांच्या कालावधीदरम्यान अमेरिकी महानगरांचा चेहरा एकेकाळच्या उपनगरांप्रमाणे तर, उपनगरांचा मुखडा शहरांप्रमाणे दिसू लागला आहे !!

यांतील सगळ्यात मोठी गंमत म्हणजे, हे सारे बदल मुख्यतः सामाजिक-सांस्कृतिक स्वरूपाचे आहेत. शहरांची निर्मिती आणि विस्तार ही स्वरूपतः आर्थिक प्रक्रिया असली तरी, शहरांची सामाजिक वीण, शहरी जीवनाचा पोत, शहरी जीवनाची वांशिक, धार्मिक, भाषिक जडणघडण, या जडणघडणीमधील बदल या अवघ्या सामाजिक-सांस्कृतिक प्रक्रिया आहेत. सामाजिक-सांस्कृतिक संबंधांची इमारत ही

आर्थिक पायावरच उभारली जात असल्याने त्या इमारतीमधील बदलांचे मूळ पायातील बदलांशी काही नाते आहे किंवा कसे, हा एक कुतूहलाचा प्रांत ठरतो. परंतु, विशेष नोंद घेण्यासारखी बाब अशी की, अमेरिकी शहरी वास्तवातील या बदलांचा शहरी अर्थव्यवस्थेतील बदलांशी संबंध असला तरी तो प्राथमिक स्वरूपाचा नाही तर दुय्यम आहे. या सांस्कृतिक बदलांना कारणभूत ठरणारे घटक शहरांच्या स्थानिक अर्थकारणाशीच संबंधित आहेत, असेही प्रकर्षाने म्हणवत नाही. या बदलांचा धागा आंतरराष्ट्रीय स्थलांतरणाशी आणि मानवी संबंधांसंदर्भातील समाजातील बदलत्या चालीरीतींशी मुख्यतः असल्याचे जाणवते.

या बदलांचे आगळेपण प्रतीत होण्यासाठी, प्रथम, 'उपनगर' या शब्दाचा अर्थ, त्याची व्याख्या आणि अमेरिकी उपनगरीय वाढीच्या काही पूर्वापार वैशिष्ट्यांची तोंडओळख करून घेणे श्रेयस्कर ठरेल. एखाद्या मोठ्या नगराच्या मेरेवरील निवासी पट्टे अथवा भूभाग म्हणजे 'उपनगर'. मुख्य शहरापेक्षा विरळ लोकसंख्या, विभक्त कुटुंबांचे संख्यात्मक प्राबल्य, या लहान आकाराच्या कुटुंबांची निवासी गरज भागविण्याच्या दृष्टीनेच 'डिझाइन' केलेली लहान-लहान एकमजली, बैठी घरे, काही प्रमाणात लाभलेली राजकीय वा प्रशासनीय स्वायत्तता, मुख्य शहरात रोज ये-जा करण्याइतपतच भौगोलिक अंतर ही सारी उपनगरीय वस्तीची पूर्वापार वैशिष्ट्ये. वाहतुकीची साधने तसेच वाहतुकीच्या तंत्रज्ञानातील सुधारणा आणि रस्तेबांधणी या उभय बाबींपायी, मुख्यतः, २०व्या शतकातील उपनगरीय वाढविस्तारास जगभरच चालना मिळाली.

'उपनगर' या संज्ञेला इंग्रजीमध्ये 'सब्-अर्बन - सबर्बन' असा प्रतिशब्द आहे. याचे मूळ रूप 'सबर्बिअम'. लॅटिन भाषेतील हा शब्द. १३८० साली हा शब्द प्रथम वापरात आला. 'Sub' म्हणजे 'Under' आणि 'Urbs' म्हणजे 'शहर'. मुख्य अथवा मोठ्या शहराच्या छायेखालील प्रदेश म्हणजे 'उपनगर'. मुख्य शहर हे राजकीय सत्तेचे तसेच व्यापारउदीमाचे केंद्र. साहजिकच, शहराच्या राजकीय आणि आर्थिक-वित्तीय सत्तासोपानावरील अभिजन सत्ताकेंद्राच्या नजीक म्हणजेच मुख्य, मोठ्या शहरात निवासास असावेत, हे ओघानेच आले. शहरांतर्गत सत्ताविभागणीतील तुलनेने कमी महत्त्वाचे, आर्थिक-सामाजिक उतरंडीच्या तळाकडील स्तरांवरील समाजसमूह, संपत्ती, राजकीय सत्ता अशा विविध बाबतींमध्ये सर्वार्थाने निम्नस्तरीय जीवन वाट्याला आलेले समाजगट मुख्य नागरी केंद्रापासून दूर वसतीस असावेत, हें तत्कालीन समाजधारणांना धरूनच होते. तेव्हा, याच समाजगटांचा वास उपनगरांमध्ये बव्हंशी असे.

**'उपनगरे' ही खरे म्हणजे 'बेडरुम कम्युनिटी'**

मुख्य शहरामध्ये निवास करणे न परवडणा-या, निम्न आर्थिक स्तरांतील समाजसमूहांच्या निवा-याचे ठिकाण म्हणजे 'उपनगर' अशीच अर्थच्छटा या संज्ञेला प्रथम होती. सर्वसाधारणपणे, १९व्या शतकाच्या पूर्वी उपनगरांबाबतची हीच धारणा असल्याचे दिसते. मोठ्या शहराच्या सीमाप्रदेशातील निवासी भूभाग, हा 'उपनगर' या संकल्पनेचा आज आम्हांला ज्ञात असलेला अर्थ तिला १९व्या शतकात प्राप्त झाला. याचेही कारण पुन्हा जितके आर्थिक, तांत्रिक तितकेच सामाजिक-सांस्कृतिकही होते. वाहतुकीच्या साधनांमध्ये आणि तंत्रज्ञानातही हळूहळू सुधारणा घडून येत होत्या. त्यामुळे शहरांच्या भौगोलिक सीमाही विस्तारत होत्या. व्यापारउद्योगांचे केंद्रीकरण शहरांमध्ये होत असल्याने शहरांतर्गत पायाभूत सेवांवरील ताण वाढत होता. शहरांच्या केंद्रवर्ती भागांतील मर्यादित जागेच्या आणि गर्दीच्या तुलनेत शहरांबाहेरील विशाल, मोकळ्या आणि स्वच्छ परिसराचे शहरांमधील धनवंतांना असलेले आकर्षण वाढत होते. मुख्यतः खासगी तसेच सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधांमधील सुधारणांमुळे शहरात रोज ये-जा करण्याचा पर्याय सुलभ, मुख्य म्हणजे स्वस्त बनला होता. साहजिकच, शहरांमधील गर्दी-गजबजाटाला विटलेल्या समाजातील उच्चभ्रूंनी उपनगरांकडे कूच करण्याचा पर्याय अवलंबला. यांत आघाडीवर होते समाजातील गर्भश्रीमंत गौरवर्णीय.

यातून अमेरिकी उपनगरांची वाढ अधिकच वेगाने सुरू झाली. या वाढीबरोबरच उपनगरवासियांच्या मानसिकतेमध्येही स्थित्यंतर घडून येत होते. ज्या समाजसमूहांचा ओढा उपनगरांकडे वळत होता त्या समूहांच्या सांस्कृतिक-सामाजिक धारणांचाही त्या स्थित्यंतरावर ठसा होता. उपनगरांचा विस्तार थेट १८व्या शतकापासून अव्याहत सुरूच असला तरी मुख्य शहराशी उपनगरास जोडून घेण्याची, उपनगराला यथावकाश मुख्य शहरात सामील करण्याबाबतची मानसिकता उपनगरवासियांमध्ये १९व्या शतकापर्यंत आढळून येत असे. शहरी सेवांचा लाभ उपनगरवासियांना मिळावा, ही त्या मागील भूमिका. उपनगरांमध्ये वास करणा-यांच्या आर्थिक-सामाजिक स्तरविशिष्ट अपेक्षांचे प्रतिबिंब या भूमिकेत डोकवावे, हे स्वाभाविकच होते. १९व्या आणि त्या नंतर २०व्या शतकातील उपनगरीय वाढीबरोबरच, उपनगरांचे अस्तित्व मुख्य शहरापेक्षा वेगळे जपण्याकडे असलेला उपनगरवासियांचा कल बळकट बनला. किंबहुना, उपनगरांचे स्थानीय स्वराज्य वा स्वयंशासन हे उपनगरीय गौरवर्णियांनी आपली पृथकता जपण्याचे साधनच मानले.

उपनगरांची ही वाढ दुस-या महायुद्धानंतर अधिकच वेगाने होऊ लागली. युद्धातून परतलेल्या सैनिकांनी, स्थिर जीवन व्यतीत करण्यासाठी, आपल्या पसंतीचे माप शहरांतील गजबजाटापेक्षा उपनगरांतील शांत जीवनराहटीच्या पारड्यात टाकले. अमेरिकी शहरी जीवनात याचदरम्यान आणखी एक स्थित्यंतर साकारत होते. त्याचेही परिणाम शहरांच्या सामाजिक-सांस्कृतिक ताण्याबाण्यांवर घडून आले. दक्षिण अमेरिकेतील आफ्रिकी वंशाचे अमेरिकी लोक तिथल्या सामाजिक वास्तवास विटून आणि त्याचप्रमाणे चांगल्या नोक-या आणि शिक्षणसंधींच्या शोधार्थ उत्तर अमेरिकेतील शहरांकडे धांव घेत होते. तत्कालीन अमेरिकी नागरी जीवनावर याचे दुहेरी परिणाम दिसून आले. डेट्रॉइट, शिकागो, फिलाडेल्फिया यांसारख्या मोठ्या शहरांत या स्थलांतरणापायी वांशिक दंगली उसळल्या. तर, त्याच वेळी या शहरांतील गौरवर्णियांनी आपली निवासस्थाने याच शहरांच्या परिघावरील उपनगरांमध्ये हलविण्यास प्रारंभ केला. साहजिकच, गौरवर्णियांच्या उपनगरीय स्थलांतरणास वेग आला. यातून उपनगरीय लोकसंख्येच्या जडणघडणीतील एकरसता अधिकच सुस्पष्ट बनत गेली. ५० वर्षांपूर्वीच्या या उपनगरांमध्ये कृष्णवर्णियांचे प्रमाण उपनगरीय एकूण लोकसंख्येमध्ये एक टक्क्याहूनही कमीच होते. उपनगरांमधील लोकसंख्या मुख्यतः वयाच्या तिशीतील संसारी गौरवर्णियांची होती.

या सगळ्याचा परिणाम असा झाला की, उपनगरांमध्ये घरबांधणीचे जणू पेवच फुटले. घरबांधणीसाठी सुलभ कर्जांच्या सुविधाही खुल्या झाल्या. रेल्वेमार्गांना धरून उपनगरांचा वाढविस्तार घडून येऊ लागला. ब्रिटनसारख्या देशात तर महानगरीय रेल्वेनेच आपल्या कर्मचा-यांसाठी घरबांधणी कार्यक्रम उपनगरांत जोमाने राबविला. रोजगार संधींचे केंद्रीकरण मात्र मुख्य व मोठ्या शहरांतच सातत्यशील होते. दुसरीकडे, मोटरींच्या संख्येत वाढ, एकंदरीतच वाहतूक सुधारणा, रस्तेबांधणी यांमुळे शहर आणि उपनगरांतील दैनंदिन दळणवळण व संपर्क सुलभ, स्वस्त आणि वेगवान बनला होता. परिणामी, उपनगरांतील कामगार-कर्मचा-यांना रोजगार-कामधंद्यासाठी मुख्य शहरात रोजची ये-जा सहजशक्य बनली होती. रोजीरोटीसाठी सारा दिवस शहरात व्यतीत करावयाचा आणि रात्री विश्रांतीपुरतेच काय ते उपनगरातील आपल्या घराकडे परतायचे, हा या कर्मचारीवर्गाचा नित्यक्रमच बनला. यातूनच, उपनगरांना आणि उपनगरवासियांना 'बेडरुम कम्युनिटी' हे अभिधान प्राप्त झाले ! या वाढीचा सामाजिक-सांस्कृतिक आयाम पुन्हा वेगळाच होता. कारण, या प्रक्रियेदरम्यान उपनगरे ही मुख्यतः कामगार-कर्मचा-यांची वसतिस्थाने म्हणून आपली ओळख दृढ करीत होती.

## आजची उपनगरे ही 'बोर्डरुम कम्युनिटी'

उपनगरांमधील वाढत्या लोकसंख्येबरोबर कंपन्यांनीही हळूहळू आपली कार्यालये व उत्पादनाशी संबंधित सुविधा उपनगरांमध्ये हलविण्यास प्रारंभ केला. यांमुळे उपनगरांमधील लोकसंख्या वाढू लागली, उपनगरेही गजबजू लागली. उपनगरांचीही घनता वाढली, त्यांचे रूप पालटले. एकंदरच लोकांचा ओढा मुख्य शहरांपेक्षाही उपनगरांकडेच वळत असल्याचा अनुभव आज येतो. १९९० ते २००६ या कालावधीदरम्यान शिकागो शहराच्या लोकसंख्येमध्ये ५० हजार रहिवाशांची भर पडली. तर, याच काळात शिकागो शहराबाहेरील नागरी विस्तारात १० लाखांची वाढ घडून आली ! पुन्हा एकवार उपनगरे अवस्थांतराच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली. मूळ मुख्य शहर आणि त्याच्या परिघावरचे उपनगर यांच्यातील रचनात्मक फरक वा सीमारेषा अस्फुट होण्याचा हा टप्पा आज अमेरिकेत ठिकठिकाणी दृष्टोत्पत्तीस येतो. पूर्वीप्रमाणे, 'उपनगर' म्हणजे मूळ मोठ्या आणि मुख्य शहराच्या पंखाखालील, आश्रयाखालील स्वरूपतः निवासी स्वरूपाची 'बेडरुम कम्युनिटी' ही ओळख आताशा पुसली जात आहे. विस्तारक्षम आर्थिक सामर्थ्याची केंद्रे, अशी या उपनगरांची 'आयडेन्टिटी' आता नव्याने प्रस्थापित होत आहें. कंपन्यांनी आपली कार्यालये उपनगरांमध्ये स्थापन करण्याचा पर्याय अवलंबल्याने 'बेडरुम कम्युनिटी'चे रूपांतर वेगाने 'बोर्डरुम कम्युनिटी'मध्ये होत आहे.

गंमत म्हणजे, या टप्प्यावरही महत्त्वाची आणि निर्णायक भूमिका बजावण्यात आघाडीवर असणारे घटकही सामाजिक-सांस्कृतिक स्वरूपाचेच आहेत. फिलाडेल्फियासारख्या मोठ्या शहराचे उपनगर बघितले तर त्याची पूर्वीची सांस्कृतिक-सामाजिक एकात्मता, वांशिक तसेच लोकसंख्यात्मक एकरसता आज पूर्णतः काळाच्या पोटात गडप झाल्याचेच अनुभवास येते. उपनगरांमधील आजची लोकवस्ती संमिश्र दिसते. बहुतेक दुकानदार हे कृष्णवर्णीय, आशियाई, अरबी दिसतात. गौरवर्णीयही आहेत, पण थोडे. ग्राहकांमध्ये तर संख्यात्मक वरचष्मा दिसतो तो कृष्णवर्णियांचाच. फिलाडेल्फियाशेजारील उपनगराच्या एकंदर लोकसंख्येत सन २००० ते २००६ या सहा-सात वर्षांच्या कालावधीदरम्यान जी भर पडली तिच्यात गौरवर्णियांचे प्रमाण होते अवघे सात टक्के ! तर, आशियाई आणि कृष्णवर्णियांचे प्रमाण होते अनुक्रमे १६ टक्के आणि २४ टक्के. सर्वांत आघाडीवर होते हिस्पॅनिक. नव्याने भर पडलेल्या लोकसंख्येत त्यांचे प्रमाण होते ६० टक्के !!

उपनगरांच्या या लोकसंख्यावाढीस लाभलेले वांशिक तसेच आंतरराष्ट्रीय स्थलांतरणाचे परिमाणही तितकेच मनोज्ञ आहे. अभ्यासकांच्या निरीक्षणानुसार, अमेरिकेत येणारे स्थलांतरित निवा-यासाठी अलीकडे थेट उपनगरांकडेच वळतात. या आधीचा कल वेगळा असे. बाहेरून अमेरिकेत येणारे वांशिक अल्पसंख्याक स्थलांतरित प्रथम मोठ्या शहरांमधील 'घेटों'मध्ये सामावले जात. काही काळ तिथे आसरा घेतल्यानंतर मग ते कोणत्या तरी उपनगरात आपले बस्तान ठोकत. आता मात्र असे स्थलांतरित वांशिक अल्पसंख्याक अमेरिकेत प्रवेशताच एकदम उपनगरांकडेच मोहोरा वळवितात. केवळ इतकेच नाही तर, उपनगरे व्यापल्यानंतर आता असे स्थलांतरित हे उपनगरांपलीकडील ग्रामीण भागही व्यापताना दिसतात. उपनगरांच्याही पलीकडे असलेल्या अशा ग्रामीण भागांना तांत्रिक परिभाषेत 'एक्सर्ब (एक्स-अर्ब)'असे संबोधले जाते.

या संपूर्ण घुसळणीमुळे अमेरिकी शहरे आणि उपनगरे यांच्या रूपांची जणू काही अदलाबदलच होत आहे. भाषिक, वांशिक, सांस्कृतिक, धार्मिक विविधता हे तर शहरांचे आद्य व्यवच्छेदक लक्षण. आज अमेरिकेतील उपनगरे या वैशिष्ट्यांनी युक्त असल्याचे चित्र दिसते आहे. अमेरिकी शहरे अधिकाधिक एकात्म, एकरस बनत आहेत तर, दुसरीकडे बहुविधता हीच उपनगरांची ओळख बनते आहे. लॉस एंजेलिस आणि न्यूयॉर्कसारख्या शहरांच्या लोकसंख्येचा २००० ते २००६ दरम्यान बदललेला चेहरामोहरा या रूपांतराची साक्ष देतो. या कालावधीमध्ये या दोन शहरांच्या लोकसंख्येत पडलेली भर ही बव्हंशी गौरवर्णियांचीच होती. या सहा वर्षांच्या काळात दोन्ही शहरांमधील कृष्णवर्णियांच्या लोकसंख्येत लक्षणीय घट अनुभवास आली. कृष्णवर्णीय लोकसंख्येला लागलेली ही गळती भविष्यातही अशीच कायम राहिली तर, काही अभ्यासकांच्या मते, २०५० सालापर्यंत लॉस एंजेलिसमधून कृष्णवर्णीय पार दिसेनासेच होतील !

उपनगरीय जीवनव्यवहारातील लवचिकता हे या सर्व परिवर्तनामागील एक मुख्य कारण आहे, असे अभ्यासकांचे प्रतिपादन आहे. विभिन्न सामाजिक-सांस्कृतिक-वांशिक परंपरांची पार्श्वभूमी लाभलेल्या जनसमूहांच्या, त्याचप्रमाणे, स्थलांतरित वांशिक अल्पसंख्याक गटांच्या आहार-विहारविषयक विविक्षित गरजा सहजपणे पूर्ण करण्याच्या क्षमता या मोठ्या आणि मुख्य शहरांपेक्षाही लहान-लहान उपनगरांच्या ठायीच अधिक चांगल्या प्रकारे विकसित झालेल्या असतात, असे एक स्पष्टीकरण या संदर्भात दिले जाते. नागरीकरणाच्या अभ्यासकांइतकेच समाजशास्त्रज्ञांनाही विचारप्रवण बनविणा-या अशाच या सा-या घडामोडी आहेत. ■■

# भारतातील राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्ष

राज्यस्तरीय पक्षांचा भारतातील राजकीय क्षितिजावर गेल्या सुमारे दोन दशकांदरम्यान झालेला उदय आणि देशातील पक्षीय राजकारणाच्या अवकाशातील त्यांचा विस्तार, हे आपल्या राजकीय तसेच पक्षीय राजकारणपद्धतीचे आज एक प्रधान वैशिष्ट्य बनलेले आहे. प्रचलित व्यवस्थेत, राष्ट्रीय स्तरावरील पक्ष तुलनेने मागे पडत आहेत तर, त्याच वेळी दुस-या बाजूने राज्य स्तरावरील पक्ष पुढे येत आहेत, हा त्या वैशिष्ट्यपूर्ण बाबीचाच आणखी एक पदर. राज्यस्तरीय या पक्षांचा निर्देश 'प्रादेशिक पक्ष' असा सरसहा केला जात असला तरी, या पक्षांचा आकांक्षा, त्यांचे कार्यक्रम तसेच त्यांच्या आजच्या कामकाजाचे स्वरूप पाहता त्यांना 'प्रादेशिक पक्ष' म्हणून संबोधणे कितपत उचित आहे, याचाही प्रश्नच पडतो. परिणामी, या पक्षांना 'प्रादेशिक पक्ष' म्हणून संबोधण्यापेक्षाही 'राज्य स्तरावरील पक्ष' असेच अभिधान त्यांना देणे हे अधिक उचित असल्याचा राज्यशास्त्राच्या अभ्यासकांचा अभिप्राय आहे.

राज्य स्तरावरील पक्षांच्या उदय व विस्ताराच्या संदर्भात १९९०चे दशक हे देशातील पक्षीय राजकारणाच्या दृष्टीने स्थित्यंतराचे दशक म्हणून गणावे लागेल. १९९०पूर्वी देशाच्या राजकीय मंचावर राज्यस्तरीय पक्ष होते, मात्र त्यांचे अस्तित्व आवर्जून दखल घ्यावी या कोटीतील नव्हते. उदाहरणार्थ, १९५२ ते १९७१ या कालावधीदरम्यान राज्य स्तरावरील पक्षांच्या लोकसभा सदस्यांची सरासरी संख्या ३४ इतकी होती. १९७७ ते १९८९ या काळात या संख्येत ५२ पर्यंत वाढ झाल्याचे दिसते. १९९१ ते १९९९ या त्या पुढील टप्प्यात राज्य स्तरावरील पक्षांच्या लोकसभा सदस्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढून १३५ वर पोहोचली. अगदी अलीकडच्या, म्हणजे, २००४ सालच्या लोकसभा निवडणुकीचा हवाला द्यावयाचा तर, राज्यस्तरीय पक्षांचे एकंदर १९१ खासदार लोकसभेमध्ये निवडून आल्याचे दिसते. या सगळ्या वाटचालीत राज्य स्तरावरील पक्षांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीतही वाढ घडून आल्याचे संबंधित आकडेवारीवरून ध्यानात येते. २००४ सालच्या लोकसभा निवडणुकीदरम्यान लोकसभेतील सर्व राज्यस्तरीय पक्षांना मिळून एकूणांतील मिळालेली ३६ टक्के मते ही काँग्रेस अथवा भारतीय जनता पक्षासारख्या राष्ट्रीय स्तरावरील पक्षांना मिळालेल्या मतांपेक्षा अधिक आहेत.

राज्यस्तरीय पक्षांच्या उदयापासून - विशेषतः, १९९०च्या दशकापासून- आमच्या देशात या संदर्भात सुरू झालेली चर्चा मुख्यत्वेकरून दोन वा तीन प्रश्नांभोवतीच फिरताना दिसते. राज्य स्तरावरील पक्षांचा हा असा उदय आणि त्यांची देशातील पक्षीय राजकारणाच्या व्यवस्थेतील महत्वाची बनत असलेली भूमिका ही इष्ट घटना समजावयाची की अनिष्ट, हा झाला या चर्चेतील पहिला मुद्दा. या चर्चेदरम्यान मांडल्या जाणा-या दोन भूमिकाही बव्हंशी दोन टोकाच्या असतात. राज्यस्तरीय पक्षांच्या माध्यमातून प्रादेशिक अस्मिता प्रकट होणे, हे देशहिताच्या दृष्टीने अंतिमतः बाधकच ठरेल, ही झाली यांतील पहिली भूमिका. तर, राज्य स्तरावरील पक्षांचा उदय ही सत्तेचे विकेंद्रीकरण घडून येत असल्याचे लक्षण असल्याने या माध्यमातून देशातील लोकशाहीप्रणालीचे त्यामुळे बळकटीकरणच घडून येईल, ही झाली दुसरी भूमिका. राज्यस्तरीय पक्षांच्याबाबतीत उपस्थित केला जाणारा दुसरा प्रश्न म्हणजे, हे असे इतके छोटे छोटे पक्ष अस्तित्वात येणे, हे चांगले की वाईट, हा. तर, अशा छोट्या पक्षांमुळे देशातील लोकशाही खरोखरच बळकट बनते का, हा झाला प्रश्नांच्या या मालिकेतील तिसरा प्रश्न. हे तीनही प्रश्न आपापल्या परीने महत्वाचे असले तरीही राजकीय व्यवस्थेच्या लेखी ते तसे लहान प्रश्नच म्हणावयास हवेत. खरा जो मुख्य प्रश्न आहे त्याची नाळ देशातील पक्षीय स्पर्धेच्या बदलत्या स्वरूपाशी जुळलेली आहे.

पूर्वापार चालत आलेली जी राजकीय चौकट वा संरचना आजमितीस आपल्या देशात विद्यमान आहे ती राजकीय संरचना आणि ही बदलती राजकीय पक्ष प्रक्रिया यांचा परस्पर नेमका संबंध काय व या बदलत्या राजकीय वास्तवात तो संबंध कसा जोडावयाचा, हा खरा महत्वाचा प्रश्न आपल्या पुढे उभा ठाकला आहे, ठाकतो आहे. प्रचलित राजकीय व्यवस्थेनुसार, निवडणुकीदरम्यान जो पक्ष सर्वाधिक जागा जिंकून विजयी होईल तो पक्ष सरकार स्थापन करतो. ही व्यवस्था, सर्वसाधारणपणे, छोट्या पक्षांच्या वाढीस हानीकारक असते, असे शास्त्र सांगते. कारण, एकूणांतील एक-दोन वा तीन टक्के मते मिळविणा-या लहान लहान पक्षांना सरकारस्थापनेची संधीच या व्यवस्थेत मिळणे दुरापास्त असते. परंतु, भारतीय पक्ष प्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे येथील राजकीय प्रक्रिया ही राजकीय संरचनेवर मात करताना दिसते ! १९८८-८९ नंतरच्या दोन दशकांदरम्यान या वास्तवाची आपल्याला अनेकवार प्रचिती आलेली आहे. जेमतेम एक-दीड टक्का मते मिळविणारे राजस्तरीय पक्षही केंद्रीय स्तरावर सरकार स्थापनेमध्ये कळीची भूमिका बजावतात, असा आपला अनुभव आहे.

साहजिकच मग पुढचा प्रश्न उपस्थित होतो तो असा की, आम्ही आज जी पक्षीय वर्गवारी करतो तिला वास्तवात खरोखरच काही अर्थ आहे का ? 'राष्ट्रीय पक्ष' आणि 'राज्यस्तरीय पक्ष' या वर्गवारीला व्यवहारात काही संदर्भ, काही प्रस्तुतता आहे का ? उदाहरणार्थ, कार्यक्रम, आजवरची वाटचाल, पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाची महत्वाकांक्षा अशा अनेक बाबी पाहता, बहुजन समाज पक्षाला त्याचे प्रभाव क्षेत्र आजमितीस केवळ उत्तर प्रदेशापुरतेच सीमित आहे म्हणून राज्य स्तरावरील पक्ष असे संबोधणे कितपत उचित ठरेल ? बिजू जनता दल आणि तृणमूल काँग्रेस हे दोन्ही पक्ष स्वरूपतः राज्य स्तरावरील पक्षच आहेत. मात्र आजवर त्यांची वाटचाल कधीही प्रदेशवादी वृत्तीने झालेली दिसत नाही. मग, 'प्रादेशिक पक्ष' म्हणून त्यांचा निर्देश करणे योग्य ठरेल का ? तीच बाब राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि डाव्या पक्षांची. केवळ तांत्रिक व्याख्येनुसार त्यांची गणना 'राष्ट्रीय पक्ष' म्हणून केली जात असली तरी वास्तवात त्यांचे स्वरूप काय ठरवायचे ? त्यांना राष्ट्रीय पक्ष म्हणावयाचे की राज्य स्तरावरील पक्ष ? आगामी काळात देशाच्या पंतप्रधानपदावर हक्क सांगू शकणारी जी काही नांवे देशाच्या पक्षीय राजकारणात आघाडीवर आहेत - उदाहरणार्थ, जयललिता, चंद्राबाबू नायडू, मायावती, मुलायमसिंह यादव, लालूप्रसाद यादव, शरद पवार, रामविलास पासवान ही यांतील काही ठळक नावे - यांपैकी एकही नांव हे तथाकथित राष्ट्रीय पक्षाच्या नेत्यांपैकी नाही. म्हणजेच, देशाच्या राजकीय व्यवस्थेतील सर्वोच्च पदासाठीची स्पर्धा ही प्रचलित चौकटीबाहेरच होईल असे दिसते. अशा परिस्थितीत 'राष्ट्रीय पक्ष' आणि 'राज्य स्तरावरील पक्ष' या पूर्वापार वर्गीकरणाची मातबरी कितपत मानावयाची ? थोड्याफार फरकाने हाच प्रश्न 'डावे पक्ष' आणि 'उजवे पक्ष', 'लहान पक्ष' आणि 'मोठे पक्ष', 'धर्मनिरपेक्ष पक्ष' आणि 'जमातवादी पक्ष', 'नवउदारमतवादी पक्ष' आणि 'राज्यनियंत्रणवादी पक्ष' अशा संज्ञा योजून केल्या जाणा-या सर्वच पारंपरिक वर्गीकरणांसंदर्भात उपस्थित करावा लागणार आहे. नव्हे, तो तसा उपस्थित झालाही आहे.

थोडक्यात सांगावयाचे तर, ही सारीच वर्गवारी अप्रस्तुत ठरवून आगामी काळात बाजूलाच ठेवावी लागेल. स्वीकारावे लागणारे वास्तव एवढेच आहे की, प्रचलित राजकीय पक्ष प्रक्रियेत पक्षापक्षांमधील स्पर्धा ही अधिकाधिक तीव्र होणार आहे. त्याचप्रमाणे, विचारप्रणाली, धोरणे, कार्यक्रम यांचा विचार केला तर पक्षोपक्षांमधील अंतर भविष्यात कमीकमीच होत जाईल.

**प्रचलित पक्ष प्रक्रियेची वैशिष्ट्ये**

काळाच्या दृष्टीने आणि काँग्रेस पक्षाच्या वाटचालीच्या कालक्रमीनुसार या सा-या घडामोडींचा विचार केला तर 'काँग्रेसउत्तर राजकारण' असे याचे वर्णन करावे लागेल. तर, ज्या सामाजिक घटिता-प्रक्रियांमधून या राजकारणाचा जन्म झाला त्या प्रक्रियांचा हवाला द्यावयाचा तर 'मंडलोत्तर राजकारण' असे या सा-या प्रक्रियेचे वर्णन करता येईल. अन्य मागासवर्गियांच्या पक्ष प्रक्रियेचे राजकारण, असाही याचा निर्देश करणे संयुक्तिक ठरेल. या टप्प्यावर, मग, आपल्याला आणखी एका प्रश्नाला सामोरे जावे लागते. विद्यमान राजकीय पक्ष प्रक्रियेची जी वैशिष्ट्ये आपणास जाणवतात ती वैशिष्ट्ये आणि अन्य मागासवर्गियांच्या पक्षीय राजकारणाची वैशिष्ट्ये यांचा परस्परसंबंध नेमका कसा आहे, हा तो प्रश्न. या प्रश्नाच्याच जोडीने मग अन्य काही प्रश्नचिन्हेही मनामध्ये उमटतात. प्रचलित राजकीय पक्ष प्रक्रियेची सारी वैशिष्ट्ये अन्य मागासवर्गियांच्या पक्षीय राजकारणाच्या वैशिष्ट्यांमधून निपजली आहेत, असे आपल्याला म्हणता येईल का ? या उभयतांच्या वैशिष्ट्यांत काही देवाणघेवाण दिसते का ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या दिशेने आगामी काळातील अभ्यास आणि संशोधनाचा प्रवास चालू ठेवावा लागेल.

गेल्या सुमारे दोन दशकांदरम्यान आपल्या देशातील पक्ष प्रक्रियेची जी वाटचाल घडून आलेली आहे तिच्या काही प्रमुख वैशिष्ट्यांची नोंद घेणे या ठिकाणी उद्‌बोधक ठरते. ही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

(अ) राजकीय घटना ज्यावर साकारतात तो राजकीय रंगमंच म्हणून, आजमितीस, राज्ये मुख्यतः उदय पावत आहेत, हे या व्यवस्थेचे पहिले ठळक वैशिष्ट्य म्हणता येईल. विशेषतः, आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर तर हे वास्तव अधिकच प्रकर्षाने जाणवू लागले. वित्तीय खुलेपणा हा या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा एक मुख्य भाग असल्याने आपापल्या प्रदेशात परकीय थेट गुंतवणुकीस चालना देणे, परकीय भांडवल तसेच गुंतवणुकदारांना आपापल्या प्रदेशांत आकर्षित करणे यांसारख्या बाबींसंदर्भातील आंतरराज्यीय स्पर्धेपायी राज्यांना आणि राज्य स्तरावरील नेतृत्वाला तसेच पक्षीय प्रक्रिया-व्यवस्थेला अधिकच महत्व प्राप्त झाले. त्यांना त्यांच्या अस्तित्वाची आवर्जून जाणीव होऊ लागली.

(आ) राज्य स्तरावर नानाविध प्रकारच्या अस्मिता जागृत होऊ लागल्याचे चित्र आता ठिकठिकाणी दिसते आहे, हे प्रचलित व्यवस्थेचे दुसरे वैशिष्ट्य. मग त्या

अस्मिता भाषिक असतील, सीमाविषयक असतील वा विकासनिधीच्या वाटपादरम्यानच्या तरतम भावासंदर्भातील असंतोषाशी संबंधित असतील.

(इ) राजकीय सत्तेचे हस्तांतरण उच्चवर्णियांकडून कनिष्ठ जातींकडे होऊ लागणे, हा झाला या पक्ष व्यवस्था-प्रक्रियेचा पुढील पैलू. वरिष्ठ जातींकडून कनिष्ठ जातींकडे सत्ता सुपूर्त केली जाण्याची प्रक्रिया तशी पूर्वीपासूनच सुरू झालेली असली तरी, विशेषतः, समाजातील मध्यम शेतकरी जातींकडे सत्तेचे हस्तांतरण घडून येण्याची प्रक्रिया आपल्या देशात १९७०च्या दशकापर्यंत साकारलेली नव्हती. या प्रक्रियेस १९७०च्या दशकात सुरुवात झाली, हे लोकशाही राज्यप्रणालीच्या दृष्टीने उचितच ठरले. परंतु या प्रक्रियेमधूनच एक अंतर्विरोधही निपजला, याची नोंद या ठिकाणी घेणे अगत्याचे ठरते. तो अंतर्विरोध असा की, उच्च जातींकडून मध्यम शेतकरी जातींकडे संक्रमित झालेली सत्ता त्यापुढे झिरपण्याची प्रक्रिया मात्र खंडित झाल्याचे अनुभवास येते. त्यामुळे, उच्च जातींकडून मध्यम जातींकडे सत्तेचे संक्रमण होणे ही लोकशाही राज्यव्यवस्थेच्या प्रकृतीच्या दृष्टीने हितकारक गोष्ट जशी ठरली तशीच ती लोकशाही प्रणालीस बाधकही ठरली. यातून हितसंबंधांची एक नवीनच व्यवस्था साकारली.

(ई) आपल्या पक्षाच्या पाठीशी जनमत संघटित करण्यासाठी अतिशय टोकदार भूमिका घेत अथवा आवाहन करीत जनसंघटनास प्रारंभ करावयाचा, असा एक नवीनच प्रकार आताशा अनुभवास येतो. 'ब्राह्मण, बनिया, ठाकूर चोर; बाकी सब बीएस फोर' यांसारखी बहुजन समाज पक्षाची सुरुवातीच्या काळातील हाक वा 'मंदिर वहीं बनाएँगे' सारखी भारतीय जनता पक्षाची प्रारंभीची भाक, ही या प्रक्रियेची वानगीदाखल काही उदाहरणे. समाजव्यवस्थेतील दृश्यादृश्य अंतरायांवर बोट ठेवून, त्यांद्वारे विशिष्ट जाती-समाजसमूहांना आवाहन करीत प्रथम जनमत आपल्याकडे वेधून घ्यावयाचे, हे यामागील तंत्र. परंतु, या प्रक्रियेतूनच पुढे एक द्वंद्व अपरिहार्यपणे जन्माला येते. लोकशाही प्रणालीच्या आपण स्वीकृत केलेल्या कार्यपद्धतीमध्ये बहुमताचे बळ पाठीशी असलेला पक्षच सिंहासनावर दावा सांगू शकतो. एखाद्या विशिष्ट गट अथवा समूहाला आवाहन करीत जनसंघटन करण्याचा मार्ग पत्करणाऱ्या पक्षांना असे बहुमत त्या त्या समूह वा जातीच्या संख्याबळावर उभे करता येत नाही. मग, त्या गटाच्या पलीकडे आपल्या पक्षाचे आवाहन पोहोचविण्यासाठी पक्षाचा पाया विस्तारणे अपरिहार्य होऊन बसते. साहजिकच, सुरुवातीच्या आक्रमकतेला मुरड घालावीच लागते. मग, एखाद्या विशिष्ट जातीच्या हितसंबंधांच्या रक्षणाचा डांगोरा पिटत असतानाच

व्यवहारात मात्र व्यापक जनहिताची भाषा बोलावी लागते, हे ते द्वंद्व. टोकदार जनसंघटनाद्वारे आपला राजकीय अवकाश शोधू पाहणा-या सर्वच पक्षांसमोरील हा पेच आहे.

(उ) शुद्ध अल्पकालिक उद्दिष्टाच्या परिपूर्तीसाठी तात्कालिक स्वरूपाच्या युत्या-आघाड्या बांधून बहुमताकडे जाण्याचा प्रयत्न करणे, हे अलीकडील पक्षीय प्रक्रियेचे आणखी एक वैशिष्ट्य. आपला परंपरागत पाठीराखा असणारा दलित समाजसमूह आणि ब्राह्मण मतदार यांची व्यूहात्मक मोट बांधून उत्तर प्रदेशातील सत्ता सर करण्याची बहुजन समाज पक्षाची खेळी या गटात मोडते. मतदारांवर डोळा ठेवून त्या त्या राज्यापुरत्या वा प्रसंगी एखाद्या निवडणुकीपुरत्या तयार केलेल्या अशा डावपेचात्मक व्यूहरचना या स्वरूपतःच नैमित्तिक असतात.

(ऊ) पक्षीय स्पर्धेला प्राप्त होत असलेले तात्कालिकतेचे परिमाण आणि त्यापायी एकंदरच स्पर्धेचे बनत असलेले अनिश्चित स्वरूप, हा आजच्या पक्ष प्रक्रियेचा त्या पुढील आणखी एक विशेष. फारसा दीर्घकालीन विचार न करता तात्पुरत्या वा नजिकच्या भविष्यातील लाभांवर नजर ठेवून केलेल्या शुद्ध डावपेचात्मक व्यूहरचनांद्वारा आपापल्या राज्यात सत्ता संपादन करून यथावकाश राष्ट्रीय स्तरावर कळीची भूमिका बजावण्याचा खाक्या राज्यस्तरीय अनेक पक्षांनी व त्यांच्या प्रमुखांनी अवलंबल्याची अनेक उदाहरणे आपण गेल्या दोन दशकांदरम्यान बघितलेली आहेत. मात्र, या संपूर्ण प्रक्रियेची परिणतीच अनिश्चित स्वरूपाच्या पक्षीय स्पर्धेमध्ये होत असल्याने एकंदरच राजकीय प्रक्रियेला एक प्रकारची अस्थिरता वेढून राहते. याचा परिणाम म्हणूनच की काय, राज्य स्तरावरील पक्ष राजकीय रंगमंचावर अवतरल्याने, सक्रिय बनल्याने राजकीय अस्थैर्याचा माहौल तयार होतो, अशा प्रकारची सर्वसाधारण नागरिकांची मानसिकता तयार होऊ लागते. राज्य स्तरावरील पक्षांची निर्मिती ही बाब इष्ट की अनिष्ट, यांसारखे प्रश्न अशा मानसिकतेमधूनच अंकुरतात.

या अवघ्या घुसळणीचा परिपाक आज असा झाला आहे की, सर्वच राजकीय पक्षांमध्ये काही बाबींसंदर्भात किमान सहमती अनुभवास येते. उदारीकरणाचा, आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा थोड्याफार फरकाने स्वीकार, ही झाली यांतील पहिली बाब. एकंदरच अर्थकारणात राज्यसंस्थेची भूमिका आगामी काळात मर्यादितच असेल वा असावी, यांबाबत बहुतेक राजकीय पक्षांदरम्यान आज मतैक्य दिसते. दुसरे म्हणजे, सामाजिक न्यायाच्या भावनेचे गारुड आज सर्वच पक्षांवर कमीअधिक प्रमाणात झालेले अनुभवास येते. समाजातील कनिष्ठ जातिसमूहांसाठी काही योजना वा कार्यक्रम

राबविणे, हा मुद्दा आज सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यक्रमपत्रिकेवर दिसतो. राखीव जागांच्या प्रश्नाबाबत आज एकही राजकीय पक्ष वेगळा सूर काढत नाही, याचे रहस्य हे आहे. पक्षीय स्पर्धेत अन्य मागासवर्गीय समाजसमूहांना सर्वच पक्ष महत्त्व देत असल्याचेही चित्र आपण पाहतो आहोत. १९९९ सालापर्यंतची स्थिती अशी होती की, राज्य स्तरावरील पक्षांचा विचार केला तर अकाली दल, दोन्ही द्रमुक पक्ष, तृणमूल काँग्रेस हे पक्ष अन्य मागासवर्गीय जनसमूहांची मते एकगठ्ठा आपल्याकडे खेचत होते. मात्र, २००४ सालच्या निवडणुकीतील मतदानाचा 'पॅटर्न' अभ्यासला तर असे ध्यानात येते की, राज्यस्तरीय पक्ष आणि काँग्रेस व भारतीय जनता पक्षासारखे राष्ट्रीय पक्ष यांनी अन्य मागासवर्गीय समाजांची मते आपल्याकडे समसमान खेचली आहेत.

पक्षांच्या संघटनात्मक बाबींकडे लक्ष वळविले तर चित्र असे दिसते की, एकंदरच विद्यमान पक्षीय व्यवस्था ही एकनेतृत्वानुयायी पद्धतीचीच आढळून येते. पक्षीय रचना सर्वसाधारणपणे व्यक्तिकेंद्रितच असल्याने औपचारिक स्वरूपाच्या पक्ष संघटनेचा अभावच अनुभवास येतो. साहजिकच, पक्षांतर्गत लोकशाहीचा या पक्षीय व्यवस्थेत संकोचच झालेला दिसतो. विविध पक्षांच्या वैचारिक अथवा/तसेच धोरणात्मक बाबींमध्येही पूर्वी दृग्गोचर होणारा फरक आताशा अस्तंगत होत असल्याचे चित्र सार्वत्रिक दिसते. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे तर, पक्षीय सीमा धूसर होत असल्याचा अनुभव येतो. साहजिकच, एकंदरच पक्षीय व्यवस्था एका अर्थाने विलक्षण लवचीक झालेली आहे. एखाद्या राजकीय पक्षात आपली उभी राजकीय कारकीर्द व्यतीत केलेला अथवा घडवलेला एखादा नेता, त्या पक्षाच्या ध्येयधोरणांपेक्षा, मूल्य वा वैचारिक चौकटीपेक्षा भिन्न प्रकृती असलेल्या पक्षात एकदम प्रवेश कसा काय करतो, याचे आपल्यापैकी अनेकांना मोठे आश्चर्य वाटते. हे आज सरसहा घडताना दिसते कारण, राजकीय पक्षांमधील फरक वा ना-फरक आजमितीस अतिशय धूसर होत आहे वा झाला आहे.

राजकीय पक्ष प्रक्रियेतील गेल्या दोन दशकांदरम्यानच्या या अवस्थांतरामुळे प्रचलित राजकारणाचे सारे आधारच जणू काही बदलून गेलेले दिसतात. याचा परिणाम. म्हणूनच की काय, आगामी काळातील एकंदरच राजकीय प्रक्रियेवर प्रभाव टाकणा-या घटकांमध्येही गुणात्मक स्वरूपाचे मूलभूत अवस्थांतर घडून येत आहे. 'दंडेलीचे राजकारण' आणि 'व्यवस्थापकीय राजकारण' अशा दोन प्रवाहांमध्ये या घटकांचे स्थूलपणे वर्गीकरण करता येईल. आपल्या पक्षाबाबत, पक्षीय भूमिकांबाबत एकंदरच

वचक वा धाक निर्माण करून त्याच्या आधारे आपला राजकीय अवकाश टिकवणे-वाढवणे, हा झाला यांतील पहिला प्रभावशाली घटक. तर, वेगवेगळ्या प्रकारचे सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक, क्रीडाविषयक, राजकीय, करमणूकप्रधान उपक्रम-कार्यक्रम आयोजित करून अथवा अशा उपक्रमांच्या व्यवस्थापनाच्याद्वारे (इव्हेन्ट मॅनेजमेन्ट) आपले शक्तिप्रदर्शन घडवून आणत आपले प्रभावक्षेत्र निर्माण करण्याच्या पर्यायांचा समावेश 'व्यवस्थापकीय राजकारणा'च्या गटात होतो.

प्रचलित पक्ष प्रक्रियेचे हे स्वरूप बघितले की साहजिकच प्रश्नांचे एक मोहोळच तयार होते. दंडेलीचे राजकारण आणि व्यवस्थापकीय राजकारण हेच जर दोन प्रवाह आता बलवत्तर ठरत असतील तर आपल्या देशात, त्या मानाने प्रदीर्घ परंपरा असलेल्या चळवळीच्या राजकारणाचा प्रवाह आता लुप्तच झाला आहे वा प्रभावहीन ठरला आहे, असे म्हणावयाचे का ? राष्ट्रीय काय वा राज्य स्तरावरील काय, पक्षांच्या एकंदरच विचारविश्वात आर्थिक, सामाजिक, आंतरराष्ट्रीय, शैक्षणिक कार्यक्रम व विचारांना काहीच स्थान नाही का ? राजकीय पक्षोपक्षांच्या सर्वसाधारण विचारसरणीवर संकुचित विचारसरणींचेच वर्चस्व राहणार असेल तर, या अशा पक्ष प्रक्रियेद्वारे लोकशाही बळकट होईल का ? किंबहुना, या परिस्थितीत 'लोकशाही' असे तरी नेमके कशाला म्हणावयाचे ? या सगळ्या पक्ष प्रक्रियेवर जागतिकीकरणाच्या प्रवाहांचा नेमका काय परिणाम घडून येतो आहे ? जागतिकीकरणामुळे ठिकठिकाणी लघुराष्ट्रीयत्वाच्या ज्या जाणिवा, अस्मिता जागृत होताना दिसतात त्यांमुळे, तसेच, वेगवान आर्थिक विकासाची अपरिहार्यता आणि त्या मानाने आपल्याकडे उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचे अपुरेपण या सा-या द्वंद्वांतून विकासाचे जे राजकारण उभरते आहे त्याला जात वा प्रदेशवादाचे अधिष्ठान लाभते आहे का ? आर्थिक-सामाजिक पैलूंबाबत एकंदरच पक्षीय राजकारणात विचारशून्यता असल्यामुळेच जात-धर्म-प्रदेश यांसारख्या तुलनेने कमी महत्त्वाच्या बाबींना अवास्तव महत्त्व मिळते आहे का ?

यापैकी बहुतांश प्रश्नांची उत्तरे आगामी काळात साकारणारी पक्ष प्रक्रियाच आपल्याला देईल, अशी अपेक्षा आहे.

***('भारतातील राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्ष' या विषयावर भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये १२ ऑक्टोबर २००८ रोजी झालेल्या चर्चासत्राचा गोषवारा. राज्यशास्त्राचे प्राध्यापक व संशोधक सुहास पळशीकर यांनी या चर्चासत्रादरम्यान बीजभाषण केले ).*** ■■

# पौष्टिक पदार्थांसाठी....

वाफेच्या शक्तीवर चालणारी आगीनगाडी आता इतिहासजमा झाली आहे. पण वाफेचे इंजिन (Steam Engine) आणि जेम्स वॉट हे समीकरण मात्र सर्वसामान्यांच्या मनात 'फिट' बसले आहे. खरे तर, वाफेच्या इंजिनाचा शोध जेम्स वॉटने लावलेला नाही. वाफेत दडलेल्या शक्तीचा उपयोग करून घेण्याचे प्रयत्न Thomas Savery, Thomas Newcomen यांनी वॉटच्या आधी केले. ब्रिटिश लष्करी अधिकारी असलेल्या Thomas Savery यांनी १६९८मध्ये या इंजिनाचे 'पेटंट' घेतले होते. त्या नंतर Newcomen यांनी या इंजिनात अधिक सुधारणा केल्या. या दोघांच्या कार्यात जेम्स वॉट यांनी अतिशय मोलाची भर घालून वाफेच्या इंजिनाची कार्यक्षमता अधिक कशी वाढेल हे पाहिले. त्यामुळे वाफेच्या इंजिनाबरोबर जेम्स वॉट यांचे नाव जोडले गेले असले तरी Savery व Newcomen या दोघांचे कार्यही महत्त्वाचे आहे, हे विसरून चालणार नाही. वाफेच्या शक्तीचा उपयोग कसा करता येईल, याचा विचार या तिघांच्याही आधी ग्रीक संशोधक Heron of Alexandria यांनी सनपूर्व पहिल्या शतकात केला होता. वाफेच्या इंजिनाचा काळ इतिहासजमा झाला आहे. मात्र, या शक्तीचा उपयोग आज अनेकानेक ठिकाणी होतो आहे. आजच्या आधुनिक 'किचन'मध्येही वाफेचा अधिक चांगला व नेमका उपयोग करून घेण्याचे प्रयोग चालू आहेत.

'सुपरहीटेड स्टीम ओव्हन'नामक एका आधुनिक उपकरणाने अलीकडे ग्राहकोपयोगी उत्पादनांच्या बाजारपेठेत प्रवेश केला आहे. पाणी उकळले (पाण्याचा boiling point १०० अंश सेल्सिअस) की त्याची वाफ तयार होते, हे आपण सर्वजण जाणतो. या वाफेला अधिक तापमान मिळाले (सुमारे ३०० अंश सेल्सिअस) की 'सुपरहीटेड स्टीम' तयार होते. 'सुपरहीटेड स्टीम' हा एक प्रकारे रंगहीन वायू असतो. वायूचे सर्व गुणधर्म या 'स्टीम'च्या ठायी असतात. 'सुपरहीटेड स्टीम'ची 'स्पेसिफिक हीट' ही हवेच्या 'स्पेसिफिक हीट'च्या तुलनेत दुपटीने अधिक असते. त्यामुळे इतर वायूंच्या तुलनेत तिच्यात ऊर्जा अधिक प्रमाणात असते. त्यामुळे अन्नपदार्थ तयार करताना या ऊर्जेचा उपयोग करता येतो.

'सुपरहीटेड स्टीम ओव्हन'मध्ये 'स्टीम'चे कार्यच मध्यवर्ती असते. नेहमी वापरात असलेले सुमारे पाऊण लिटर साधे पाणी या ओव्हनच्या टाकीत घालायचे. पाण्याला उकळी आल्यानंतर या ओव्हनमधील विशिष्ट यंत्रणा या पाण्याला/वाफेला अधिक तापमान पुरविते. ओव्हनचा बाहेरचा भाग मात्र या प्रक्रियेत गरम होत नाही. हात लावता येण्याइतपत तो थंड असतो. याच वेळी तापमान, 'स्टीम' आणि 'सुपरहीटेड स्टीम' यांची एक विशिष्ट कार्यपद्धती ओव्हनमध्ये असल्याने अन्नपदार्थांवर त्यांचा सुयोग्य परिणाम घडून येतो. ही 'सुपरहीटेड स्टीम' अस्थिर असते व तिच्यात भरपूर ऊर्जा असल्याने ती थंड जागेच्या शोधात असते. त्यामुळे ती फार वेगाने अन्नात शिरकाव करते. अन्नात प्रवेश केल्याबरोबर 'स्टीम' गोठते. परिणामी अन्नातील मेदघटक (फॅट) विरघळतात आणि ते द्रवरूप होऊन पदार्थांतून बाहेर पडतात. साहजिकच अन्नपदार्थांमधील उष्माकांचे (कॅलरीज्) प्रमाण घटते. अन्नपदार्थांमधील या मेदघटकांची जागा आर्द्रता घेते. अन्नघटकांमधील जीवनसत्वे आणि इतर पोषक घटक यांचे नैसर्गिक प्रमाण या सर्व प्रक्रियेत कायम राहते. किंबहुना, नेहमीच्या पद्धतीने शिजविण्यात आलेल्या पदार्थांच्या तुलनेतही या ओव्हनमध्ये शिजविलेल्या पदार्थांमध्ये जीवनसत्वे आणि इतर पोषक घटक यांचे प्रमाण अधिक असते.

हा ओव्हन वापरण्यास व मुख्य म्हणजे स्वच्छ करण्यास सुलभ आहे. यातील मायक्रोकंट्रोलरच्या मदतीने सर्व कार्यपद्धती अतिशय व्यवस्थित चालते. सुरक्षेची सर्व खबरदारी यात घेतली जाते. म्हणजे, पाण्याची पातळी कमी झाल्याचे सेन्सरद्वारे समजते व तसा संदेश दिला जातो. पाणी बदलण्याची सूचना हे यंत्र देते. यातील पदार्थ ओव्हनच्या अंतर्गत पद्धतीनुसार (ऑटो) वा ग्राहकाच्या पसंतीनुसार (मॅन्युअल) अशा दोन्ही प्रकारे शिजविता येतात. या ओव्हनमध्ये भाजणे, शिजविणे, उकडणे (roast, grill, steam bake/general, defrost and reheat) इत्यादी प्रकारांनी अन्नपदार्थ तयार करता येतात. थोडक्यात, 'सुपरहीटेड स्टीम'चा उपयोग आरोग्यदायी आहे. त्यामुळे अनेक कंपन्या हा ओव्हन बाजारपेठेत आणत आहेत. जपानमधील शार्प कंपनी या ओव्हनची आद्यप्रवर्तक आहे. भारतातील गोदरेज कंपनीनेही आता यात प्रवेश केला आहे. या उत्पादनाची कार्यक्षमता वाढवून किंमत कमी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. अन्नपदार्थांची पौष्टिकता कायम राखणारे हे उपकरण संपूर्ण घराच्या आरोग्याच्या 'काळजी'वाहू पंतप्रधान असलेल्या आजच्या 'होम मेकर' स्त्रीला उपयुक्त वाटावे. ■■

**प्रमुख संदर्भ** - (1) Prospect, July 2008 (2) Survival, Vol. 50 no.1, February-March 2008 pp. 55-68 (3) Electronics for you, June 2008, (4) The Economist, May 31st- June 6th 2008, PP. 31-33. ■■

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता
# आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणा-यांना 'अर्थबोधपत्रिका' मासिक एक वर्ष विनामूल्य**

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**(१ जून २००६ पासून)**

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

■ **Fair Future : Resource Conflicts, Security and Global Justice, Wolfgang Sachs, Tilman Santarius (Ed.), Translated in English by Patrick Camiller, Fernwood Publishing Co. Ltd, 2007, PP. xi + 276, Price - Rs. 325/-**

पर्यावरण जपायचे की आर्थिक विकासाला महत्त्व द्यायचे ? मर्यादित नैसर्गिक संसाधने, वाढती लोकसंख्या आणि न्याय्य विकास यांची सांगड कशी घालायची ? खनिज तेल, पाणी, वनसंपत्ती, अन्नधान्याची सुरक्षा इत्यादी प्रश्नांमुळे देशांतर्गत व देशादेशांत अशांतता निर्माण झाली तर काय करायचे ? चालू शतकात हे प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वाचे ठरत आहेत. त्यामुळे अभ्यासकांच्या विचारविश्वातही त्याला वरचे स्थान मिळू लागले आहे. जर्मनीतील Wuppertal Institute नेही या प्रश्नांकडे आपले लक्ष केंद्रित केले आहे. या प्रश्नांचा सर्वंकष विचार करण्यासाठी संस्थेने प्रवर्तित केलेल्या संशोधनपर अभ्यासाच्या आधारे Fair Future हा ग्रंथ सिद्ध झाला आहे. जागतिकीकरणाचा कोणता मार्ग सातत्यशील ठरेल, या प्रश्नाभोवती हा अभ्यास करण्यात आला. विविध विषयांतील सुमारे २० अभ्यासकांनी सतत तीन वर्षे केलेल्या या अभ्यासाद्वारे न्याय्य विकास कसा साधता येईल, याचा ऊहापोह करण्यात आला आहे. जागतिक न्यायाचे महत्त्व अधोरेखित करून परिसरविज्ञान व पर्यावरणविषयक प्रश्न कोणते आहेत, ते या पुस्तकात मांडण्यात आले आहे. त्याचबरोबर मानवाधिकार, नैसर्गिक साधनसामग्रीचे न्याय्य वाटप व न्याय्य व्यापार यांचाही विचार या ग्रंथात केला आहे. असे न झाल्यास नुकसान भरपाईचा मार्ग कोणता असावा याही विषयाला पुस्तकाने स्पर्श केला आहे. आलेख व आकडेवारी यांचा नेमका उपयोग केल्याने हा विषय स्पष्ट व्हायला मदत होते. तसेच या विषयाचे गांभीर्यही ध्यानात यायला मदत होते. या जगात न्याय प्रस्थापित करायचा असेल तर अमेरिकी जीवनशैलीचे जागतिकीकरण होऊन तो प्रस्थापित होणार नाही, असे या ग्रंथात नमूद करण्यात आले आहे. लोकशाहीवादी आणि सर्वांना सामावून घेणारी परिव्यवस्था येथून पुढे गरजेची ठरेल, ही भूमिका घेणारे हे पुस्तक आजच्या 'जागतिक नागरिकां'साठी उपयुक्त ठरावे. ■■

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
Licensed to Post Without Prepayment, LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•विकास चित्रे •अभय टिळक •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी
•सुहास पळशीकर •रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •एस. श्रीरामन •जया सागडे •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**